दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक




• वर्ष : ०४ • अंक : ०६७ • पुणे • शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313



दुबईत अडकलेल्याची मोहोळ यांच्या प्रयत्नांतून सुटका

3



जुन्नरच्या भाजीपाला बाजारावरील कारवाई केवळ दिखावा?

4

ठळक बातम्या

दाम्पत्याला मारहाण

पुणे (आरंभ पर्व) : शेतात काम करणाऱ्या दाम्पत्याला पहिल्या पत्नीसह चौघांनी मिळून लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केल्याची घटना खेड येथे घडली. याप्रकरणी फिर्यादीची पहिली पत्नी, तिची आई (दोघी रा. वासुली, ता. खेड) आणि दोन अनोळखी पुरुषांविरोधात उत्तर म्हाळुंगे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि त्यांची पत्नी घरासमोरील शेतात काम करीत होते. त्यावेळी आरोपी तेथे आले. दोन्ही महिलांनी दाम्पत्याला हाताने, तर अनोळखी पुरुषांनी लाकडी दांडक्याने मारहाण केली.

रिक्षाचालकाला मारहाण

पुणे (आरंभ पर्व) : रिक्षात प्रवासी भरण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून दोन रिक्षाचालकांनी एका रिक्षाचालकाला लोखंडी कड्याने मारहाण केली. ही घटना मोरवाडीत घडली. याप्रकरणी दोघांविरोधात संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रवासी भरत असताना आरोपींनी त्यांच्याशी वाद घातला. त्यानंतर दोघांनी हातातील लोखंडी कड्याने आणि हाताने मारहाण करून फिर्यादीला जखमी केले. तसेच शिवीगाळ करून गाडी पलटी करण्याची धमकी दिली. संत तुकारामनगर पोलीस तपास करीत आहेत.

हॉटेल व्यावसायिकाला बेदम मारहाण

पुणे (आरंभ पर्व) : चिकन दुकान भाड्याने घेण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून दोघांनी हॉटेल व्यावसायिकाला मारहाण केली. ही घटना १८ नोव्हेंबर रोजी सुसगाव येथे घडली. याप्रकरणी दोघांविरोधात बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हॉटेल बंद करून जेवण करीत असताना आरोपी तेथे आले. एकाचे चिकन दुकान भाड्याने घेतल्याच्या रागातून आरोपींनी शिवीगाळ केली. स्टीलच्या डब्याच्या झाकण, लोखंडी हत्याराने नाकावर व डाव्या डोळ्याखाली वार केले. बावधन पोलीस तपास करीत आहेत.

अंतर्गत वर्तुळाकार मार्गाला गती!

पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) अंतर्गत वर्तुळाकार मार्गाचा आराखडा तयार करून भूसंपादन सुरू केले आहे. त्यानंतर आता पुणे महापालिकेनेही या दिशेने पावले टाकली आहेत. महापालिकेने या मार्गाचा सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. यासाठी सल्लागार नेमण्याची प्रक्रिया महापालिकेने सुरू केली आहे. या मार्गामुळे पुण्याची नाशिक, सोलापूर, अहिल्यानगर, साताऱ्याशी जोडणी अधिक वेगवान होणार असून शहराच्या अंतर्गत वाहतुकीवरील ताण कमी होणार आहे. पुणे परिसराच्या भविष्यातील वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टिकोनातून अंतर्गत वर्तुळाकार मार्गाचे नियोजन करण्यात आले आहे.

पिंपरी महापालिकेची बाळंतविडा योजना!

मातांना पौष्टिक खाऊ व नवजात मुलींना बाळंतविडा देण्याची नवी योजना

पिंपरी (दै. आरंभ पर्व)

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागाने प्रसूती झालेल्या मातांना पौष्टिक खाऊ व नवजात मुलींना बाळंतविडा देण्याची नवी योजना आणली आहे. यासाठी तीन वर्षांसाठी अल्प मुदतीची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत वर्षाला २५ कोटीप्रमाणे ७५ कोटींचा खर्च करण्यात येणार आहे.



महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. शहरातील रहिवासी आणि महापालिका कार्यक्षेत्रातील रुग्णालये, दवाखाने येथे नोंद झालेल्या स्तनदा माता यांच्यासाठी पौष्टिक खाऊ व नवजात मुलींना बाळंतविडा देण्यासाठी समाज विकास विभागाने नुकतीच निविदा प्रसिद्ध केली आहे. शहरात सन २०२२ मध्ये ३३ हजार ५३, २०२३ मध्ये ३१ हजार ४४३, २०२४ मध्ये ३४ हजार ३५ आणि २०२५ मध्ये ३५ हजार २२६ बालकांचा जन्म झाला. त्यांमध्ये सरासरी १५ ते १६ हजार मुलींचा समावेश आहे. प्रसूतीनंतर मातांना पौष्टिक आहार उपलब्ध व्हावा, नवजात बालिकांना किट देण्याचा उद्देश असल्याचे समाज विकास विभागाने सांगितले. प्रसूत मातांसाठीच्या संचामध्ये खारीक, खोबरे, गूळ, फुटाणा डाळ, गावरान तूप, बदाम, खजूर, काजू, आळीव, जवस, तीळ, ओवा, बडीशेप आणि मेथीचे दाणे यांचा समावेश आहे. हे साहित्य दहा किलो क्षमतेच्या कापडी पिशवीतून दिले जाणार आहे. नवजात मुलीसाठीच्या बाळंतविडा संचात फ्रॉक, झबले, कानटोपी, लंगोट, दुपटे, लोकरीचे स्वेटर, टोपी, पायमोजे, बेबी मसाज ऑईल, बेबी पावडर, पावडर कंटेनर, बेबी सोप आणि आईसाठी मसाज ऑईल अशा १३ वस्तूंचा समावेश आहे. या योजनेचा लाभ संबंधित मातेच्या पहिल्या दोन नवजात बालिकांसाठी लागू राहणार आहे. दरम्यान, महिला व बालकल्याण समितीच्या ठरावानुसार निविदा प्रसिद्ध केली आहे. यासाठी निधी उपलब्ध नाही. निधीची तरतूद झाल्यानंतरच हे काम करण्यात येईल, या अटीसह निविदा प्रसिद्ध केली आहे. सर्वात कमी दर देणाऱ्या ठेकेदाराला काम दिले जाईल, असे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी सांगितले. महापालिकेचे आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची झालेली असून महानगरपालिका कर्जबाजारी झाली आहे. महापालिकेत विकास कामे केलेल्या ठेकेदाराची सुमारे चार हजार कोटी पेक्षा अधिक रक्कमेची देयके प्रलंबित आहेत. संपूर्ण राज्यावर व देशात दुष्काळाचे भयानक सावट असताना महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत ३६ हजार मातांना पौष्टिक खाऊ व १७ हजार नवजात मुलींना बाळंतविडा देण्याची नवीन योजना आणली आहे.

नोकरी लावण्याच्या आमिषाने सव्वा कोटींची फसवणूक



पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे महापालिकेत नोकरी लावण्याचे आमिष दाखवून बनावट नियुक्तीपत्रे देऊन बेरोजगार तरुणांकडून एक कोटी ३७ लाख ४४ हजार रुपये उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी एकाविरोधात पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने पुणे महापालिकेत ओळख असल्याचे सांगून नोकरीचे आश्वासन दिले. महापालिकेचे शिक्के वापरून बनावट लेटरपॅडवर नियुक्तीपत्रे देऊन विश्वास संपादन केला. फिर्यादीकडून नऊ लाख ३३ हजार ६०० रुपये, तर इतर साक्षीदारांकडून एक कोटी २८ लाख १० हजार ४०० रुपये उकळले. पिंपरी पोलीस तपास करीत आहेत.

कार्यालयीन वेळेत गायब, आयुक्तांचा दहा कर्मचाऱ्यांना दणका

पिंपरी (दै. आरंभ पर्व)

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील कर्मचाऱ्यांची बेशिस्त वाढल्याच्या तक्रारीनंतर सामान्य प्रशासन विभागाच्या भरारी पथकाने विविध विभागात पाहणी करून जागेवर नसलेल्या दहा लिपिकांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. २१ आणि २१ ऑक्टोबरला करण्यात आलेल्या तपासणीदरम्यान ही बाब निदर्शनास आली. संबंधित कर्मचाऱ्यांकडून नोटीस मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत खुलासा मागविण्यात आला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थापत्य विभागातील मुख्य लिपिक सुनील चव्हाण, विशाल कांबळे, लिपिक स्वाती गुल्हाने, मनीषा इंगवले, प्रगती कांबळे, राहुल सकटे, संकेत पेटकर, प्रियांका कोंढाळकर, लखन डफळ, अनिकेत पवार यांना नोटीस बजावण्यात आली आहे. प्रभावी आणि लोकाभिमुख प्रशासनासाठी प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने कार्यालयीन शिस्त पाळणे आवश्यक आहे. याबाबत यापूर्वीही परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र, तपासणी पथकाच्या पाहणीत संबंधित कर्मचारी कार्यालयीन कामकाजाच्या वेळी जागेवर उपस्थित नसल्याचे आढळले. महापालिका अधिनियमानुसार संबंधित कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई का करण्यात येऊ नये, याचा खुलासा मागविण्यात आला आहे. संबंधित कर्मचाऱ्यांनी विभागप्रमुखांच्या स्पष्ट शिफारशींसह खुलासा सादर करणे बंधनकारक आहे. खुलासा असमाधानकारक आढळल्यास शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असा इशाराही सामान्य प्रशासन विभागाने दिला आहे.



पुण्यात पुढील दोन महिने अतिक्रमणांवर कारवाई

आयुक्त नवल किशोर राम यांचा इशारा

पुणे (दै. आरंभ पर्व)

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सत्ताधारी, विरोधी पक्षाच्या नगरसेवकांनी अतिक्रमणे वाढल्याचे खापर महापालिका प्रशासनावर फोडल्याचे पडसाद आता उमटू लागले आहेत. पुढील दोन महिन्यात शहरातील रस्त्यांवर 'बुलडोझर' आणि 'जेसीबी' फिरणार असून, कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता अतिक्रमणांवर कठोर कारवाई करण्याची घोषणा आयुक्त नवल किशोर राम यांनी केली.



या कारवाईनंतर शहरातील वाहतूक, पुणेकरांच्या राहणीमानात २५ टक्के सुधारणा होण्याचा दावा आयुक्तांनी केला. शहरातील विविध भागात मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली असून वारंवार तक्रारी करुनही महापालिका प्रशासन दुर्लक्ष करत असल्याची तक्रार दोन दिवसांपूर्वी झालेल्या सर्वसाधारण सभेत नगरसेवकांनी केल्या होत्या. महापालिका प्रशासन अतिक्रमणांसाठी जबाबदार असून महापालिकेतील अधिकारी, आयुक्तांना यामध्ये सहआरोपी करा, अशी जाहीर मागणी नगरसेवकांनी केली होती. त्यानंतर महापालिका आयुक्त राम यांनी प्रशासनाला कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. गेल्या दोन दिवसांपासून शहरातील विविध भागातील अतिक्रमणांवर कारवाई सुरु करण्यात आली आहे. शहरात सुमारे दोन ते अडीच लाख दुकाने ही 'फ्रंट' आणि 'साईड' मार्जिनमध्ये सुरु आहेत. या सर्व दुकानदारांनी तातडीने केलेली अतिक्रमणे काढून घ्यावीत, असे आवाहन करतानाच पुढील दोन महिन्यांमध्ये शहरातील बहुतांश अतिक्रमणे काढण्याचा दृढ संकल्प महापालिकेने केल्याचे महापालिका आयुक्त राम यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. यावेळी शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर उपस्थित होते. अतिक्रमणे काढताना कोणाचाही हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही. जे कोणी दबाब आणण्याचा प्रयत्न करतील त्यांची नावे महापालिकेकडून जाहीर केली जातील, असा इशाराही त्यांनी दिला. महापालिकेच्या बांधकाम विभागाने आपली जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडली तर महत्वाच्या रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी सुटून राहण्यास योग्य अशी पुणे शहराची असलेली ओळख अधिक चांगली होईल. रस्त्यावरील पथारी व्यावसायिक तसेच दुकानदारांकडून होणारी अतिक्रमणे आता खपवून घेतली जाणार नाही. दोन महिने नियमीतपणे कोणताही खंड न पडता अतिक्रमणांवर कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. आयुक्त राम म्हणाले, शहरातील अतिक्रमणांवर कारवाई सुरु करण्यात आली आहे. कोणताही दबाव आला तरी प्रशासन मागे हटणार नाही, असा संकल्प करण्यात आला आहे. महापालिकेतील अधिकाऱ्यांनी आपले अधिकार वापरून जबाबदारी पार पाडावी, असे आदेश दिले आहेत. दोन महिन्यांत पुणे शहरात फरक दिसेल. कोथरूड भागातील अतिक्रमणांवर महापालिकेची कारवाई सुरु होती. त्यावेळी कारवाई थांबवावी, यासाठी एका मंत्र्यांनी त्यांना फोन केला. मात्र कोणताही दबाव स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला. या भागात सुरु असलेली कारवाई थांबविण्या ऐवजी तातडीने पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिले.

नात्यांची वीण प्रेमाने घट्ट होते की पगार, पद आणि प्रतिष्ठेच्या हिशेबाने?


लग्न दोन मनांचं की दोन बायोडेटांचं?

प्रतिक गंगणे
(दै. आरंभ पर्व)

एक काळ होता, जेव्हा लग्न म्हणजे दोन कुटुंबांचे ऋणानुबंध जुळणे आणि दोन अनोळखी माणसांनी आयुष्यभर एकमेकांची साथ देण्याचा घेतलेला निर्णय मानला जायचा. संसार कसा उभा करायचा, अडचणींवर मात कशी करायची आणि सुख-दुःखात एकमेकांच्या पाठीशी कसे उभे राहायचे, याला महत्त्व असायचे. मात्र, काळ बदलला आणि त्यासोबत लग्नाची व्याख्याही बदलू लागली. आजकाल लग्न जुळवताना दोन मनं किती जुळतात, यापेक्षा दोन बायोडेटा किती जुळतात, याचीच अधिक तपासणी होताना दिसते.

मुलगा काय करतो? त्याचे वार्षिक उत्पन्न किती? नोकरी कोणत्या कंपनीत आहे? स्वतःचे घर आहे का? चारचाकी गाडी आहे का? परदेशात जाण्याची संधी आहे का? तर दुसरीकडे मुलीचे शिक्षण, नोकरी, पगार, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती आणि सामाजिक प्रतिष्ठा यांचीही तपासणी केली जाते. या सगळ्या प्रश्नांमध्ये एक महत्त्वाचा प्रश्न मात्र मागे पडतो, तो म्हणजे या दोघांचे विचार जुळतात का? एकमेकांचा स्वभाव समजून घेण्याची तयारी आहे का? आयुष्यात संकट आले तर हे दोघे एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून उभे राहतील का?

अर्थात, आर्थिक स्थैर्याला महत्त्व देणे चुकीचे नाही. आजच्या महागाईच्या काळात संसार चालवण्यासाठी आर्थिक नियोजन आवश्यकच आहे. स्वतःचे घर, चांगली नोकरी आणि सुरक्षित भविष्य यांची अपेक्षा असण्यातही गैर काहीच नाही. प्रश्न अपेक्षांचा नाही, तर त्या अपेक्षांनी नात्यांवर मिळवलेल्या वर्चस्वाचा आहे.



आज अनेक ठिकाणी लग्न ठरवण्यापूर्वी एकमेकांना समजून घेण्यापेक्षा एकमेकांची आर्थिक पात्रता तपासली जाते. जणू काही विवाह हा दोन व्यक्तींमधील भावनिक प्रवास नसून दोन कंपन्यांमधील व्यावसायिक करार असावा! मुलाचा पगार, मुलीचे उत्पन्न, दोघांची मालमत्ता, भविष्यातील आर्थिक लाभ यांची बेरीज-वजाबाकी केली जाते. मात्र, राग आला तर समजून कोण घेणार? अपयश आले तर धीर कोण देणार? आजारपणात काळजी कोण घेणार? आणि आयुष्याच्या कठीण वळणावर हातात हात घालून कोण उभे राहणार? या प्रश्नांची उत्तरे केवळ बँकेतील शिल्लक देऊ शकत नाही.

आणखी एक चिंताजनक बाब म्हणजे वाढत चाललेला अहंकार. लग्नानंतर माझी जबाबदारी, तुझी जबाबदारी, माझे पैसे, तुझे पैसे, माझे आई-वडील, तुझे आई-वडील अशा विभागणीत संसाराचे रूपांतर होऊ लागते. नात्यात समजूतदारपणा कमी झाला की छोट्या गोष्टींचे मोठे वाद होतात. दोघांपैकी कुणीही माघार घ्यायला तयार नसते. चूक मान्य करण्यापेक्षा स्वतःला योग्य सिद्ध करण्याची धडपड अधिक असते. अशा वेळी प्रश्न पडतो की, आपण संसार करतोय की एकमेकांशी सतत स्पर्धा? विवाह म्हणजे कोण जास्त कमावते, कोणाचा शब्द अंतिम किंवा कोणाचे कुटुंब मोठे, याची स्पर्धा नाही. विवाह म्हणजे दोन स्वतंत्र व्यक्तिमत्त्वांनी एकत्र येऊन तिसरे सुंदर जग निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. त्यासाठी दोघांनीही एकमेकांच्या स्वप्नांचा आदर करणे, एकमेकांच्या मर्यादा स्वीकारणे आणि गरज पडल्यास स्वतःचा अहंकार बाजूला ठेवणे आवश्यक असते.

आजच्या तरुण पिढीनेही एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. लग्न करताना केवळ चांगले घर, गाडी, पगार आणि प्रतिष्ठा पाहू नका.

समोरची व्यक्ती तुमच्याशी कशी बोलते, तुमच्या मतांचा किती आदर करते, तिच्यात जबाबदारीची जाणीव किती आहे, मतभेद झाले तर ती कशी वागते आणि तुमच्या कठीण काळात साथ देण्याची तिची मानसिकता आहे का, हेही तपासा.

कारण पगार वाढू शकतो, घर मोठे होऊ शकते, गाडी बदलू शकते आणि पद-प्रतिष्ठाही मिळू शकते. पण एकदा नात्यातील विश्वास तुटला की तो पुन्हा निर्माण करणे अत्यंत कठीण असते.

शेवटी संसार टिकवण्यासाठी मोठ्या पगाराची नाही, तर मोठ्या मनाची गरज असते. नात्याला महागड्या भेटवस्तूंपेक्षा वेळ हवा असतो, दिखाव्यापेक्षा संवाद हवा असतो आणि अधिकार गाजवण्यापेक्षा एकमेकांना समजून घेण्याची वृत्ती हवी असते.

कारण लग्नाच्या पत्रिकेत दोन नावं छापली जातात, पण आयुष्यभराचा संसार दोन स्वभावांनी, दोन मनांनी आणि परस्परांच्या विश्वासाने उभा राहतो. नात्याची सुरुवात जर आकड्यांच्या आणि प्रतिष्ठेच्या हिशेबाने झाली, तर प्रेमापेक्षा अहंकाराचे पीक अधिक जोमाने वाढण्याची शक्यता असते.

उशिरा सुचलेले शहाणपण!

पुणे शहरातील अतिक्रमणे आणि अनधिकृत बांधकामांविरोधात पुणे महानगरपालिकेने अखेर कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवात केली आहे. फर्ग्युसन कॉलेज रोडवरील प्रसिद्ध हॉंगकॉंग लेनमधील अनधिकृत दुकानांना सील ठोकण्याची कारवाई ही त्याच मोहिमेचा एक भाग आहे. महापालिकेच्या या कारवाईचे स्वागतच केले पाहिजे; मात्र यानिमित्ताने एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो, तो म्हणजे शहरातील अतिक्रमणांचा प्रश्न इतका वर्षे प्रलंबित का राहिला? आणि प्रशासनाला कारवाई करण्यासाठी एवढा उशीर का झाला?



संपादकीय - सुरेखा-मते

पुणे हे विद्येचे माहेरघर, सांस्कृतिक वारसा जपणारे आणि वेगाने विकसित होणारे शहर म्हणून ओळखले जाते. मात्र गेल्या काही वर्षांत या शहराच्या सौंदर्याला आणि नियोजनाला अतिक्रमणांचा विळखा पडला आहे. रस्ते अरुंद झाले, पदपथांवर दुकाने उभी राहिली, चौकांमध्ये अनधिकृत टपऱ्यांचे साम्राज्य निर्माण झाले आणि सार्वजनिक जागांवर खासगी मालकी असल्याप्रमाणे कब्जा केला जाऊ लागला. नागरिकांना चालण्यासाठी जागा उरली नाही, वाहनचालकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो आणि आपत्कालीन सेवांनाही अनेकदा मार्ग काढणे कठीण होते. हे चित्र पुण्याच्या अनेक भागांत पाहायला मिळते.

फर्ग्युसन कॉलेज रोडवरील हॉंगकॉंग लेन हे त्याचे ठळक उदाहरण आहे. तरुणाई आणि खरेदीदारांचे आकर्षण असलेल्या या परिसरात अनधिकृत दुकानांची संख्या वाढत गेली. सुरुवातीला एखादी छोटीशी टपरी, त्यानंतर दुकान आणि पुढे संपूर्ण जागेवर अतिक्रमण, असा हा प्रवास सुरू राहिला. हे सर्व घडत असताना महापालिकेचे संबंधित विभाग नेमके काय करत होते? अतिक्रमणे एका रात्रीत उभी राहत नाहीत. बांधकाम सुरू होते, साहित्य येते, दुकाने थाटली जातात आणि व्यवसाय सुरू होतो. मग प्रशासनाच्या नजरेतून हे सर्व कसे सुटले? की जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले? अतिक्रमणांना केवळ अतिक्रमण करणारेच जबाबदार नसतात, तर त्यांना वेळेत रोखण्यात अपयशी ठरणारी यंत्रणाही तितकीच जबाबदार असते. एखाद्या सामान्य नागरिकाने नियम मोडला तर त्याच्यावर तत्काळ कारवाई होते; मात्र सार्वजनिक जागांवर वर्षानुवर्षे अतिक्रमणे वाढत असताना प्रशासन शांत का राहते? या प्रश्नाचे उत्तर महापालिकेने जनतेला दिले पाहिजे. अतिक्रमणांना अभय देणारे अधिकारी, कर्मचारी किंवा राजकीय हस्तक्षेप असल्यास त्यांच्यावरही कारवाई झाली पाहिजे.

आज महापालिकेला जाग आली आहे, ही निश्चितच समाधानाची बाब आहे. पण ही जाग केवळ एखाद्या प्रसिद्ध बाजारपेठेपुरती मर्यादित राहू नये. शहरातील सर्व रस्ते, पदपथ, चौक, नाले, सार्वजनिक जागा आणि आरक्षित भूखंड यांचे सर्वेक्षण करून अतिक्रमणमुक्त पुण्याची मोहीम हाती घेतली पाहिजे. कारवाई करताना गरीब आणि श्रीमंत, सामान्य व्यावसायिक आणि प्रभावशाली अतिक्रमणधारक असा भेदभाव होता कामा नये. कायदा सर्वांसाठी समान असला पाहिजे.

त्याचबरोबर अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमेत केवळ दुकानांना सील ठोकून किंवा बांधकामे पाडून प्रशासनाची जबाबदारी संपत नाही. पुन्हा त्याच जागेवर अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घेणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यासाठी नियमित पाहणी, सीसीटीव्ही यंत्रणा, जबाबदार अधिकाऱ्यांची नियुक्ती आणि नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही अशी कायमस्वरूपी व्यवस्था उभी करावी लागेल. फुटपाथ हे पादचाऱ्यांसाठी असतात, दुकानदारांसाठी नाहीत. रस्ते वाहतुकीसाठी असतात, अनधिकृत पार्किंग किंवा व्यवसायासाठी नाहीत. सार्वजनिक जागा या सर्व नागरिकांच्या मालकीच्या असतात, कोणाच्या वैयक्तिक फायद्यासाठी नव्हेत. ही साधी बाब प्रशासन आणि नागरिक दोघांनीही समजून घेण्याची गरज आहे. अर्थात, लहान व्यावसायिकांच्या उपजीविकेचा प्रश्नही दुर्लक्षित करता येणार नाही. कायदेशीर पर्यायी जागा, नियोजित विक्री क्षेत्र आणि फेरीवाला धोरणाची प्रभावी अंमलबजावणी यांचाही विचार झाला पाहिजे. पुणे महानगरपालिकेची सध्याची कारवाई ही स्वागतार्ह असली, तरी तिचे मूल्यमापन केवळ किती दुकाने सील केली किंवा किती अतिक्रमणे हटवली यावर होऊ नये. तर भविष्यात शहरात नव्याने अतिक्रमणे होऊ नयेत, यासाठी प्रशासन किती सक्षम आणि प्रामाणिकपणे काम करते, यावर व्हायला हवे.

शहर बकाल झाल्यानंतर कारवाई करणे म्हणजे रोग बळावल्यानंतर उपचार करण्यासारखे आहे. अतिक्रमणे उभी राहत असताना त्यांना रोखले असते, तर आज नागरिकांना या समस्येचा सामना करावा लागला नसता. त्यामुळे महापालिकेची ही मोहीम केवळ तात्पुरती धडक कारवाई न ठरता शहराच्या शिस्तबद्ध विकासाची सुरुवात ठरली पाहिजे.

कारवाईला उशीर झाला असला, तरी आता तरी प्रशासनाला सुचलेले शहाणपण कायम टिकले पाहिजे. कारण पुणे शहराला अतिक्रमणमुक्त करण्यासाठी केवळ बुलडोझरची नव्हे, तर इच्छाशक्ती, पारदर्शकता आणि सातत्यपूर्ण प्रशासनाची गरज आहे. अन्यथा आज हटवलेली अतिक्रमणे उद्या पुन्हा उभी राहतील आणि पुणेकरांच्या वाट्याला पुन्हा तोच प्रश्न येईल - उशिरा सुचलेले शहाणपण किती दिवस टिकणार?

आठ आस्थापनांना व्यवसाय बंदच्या नोटिसा

जे. एम. रोडवरील खाऊ गल्लीवर अन्न व औषध प्रशासनाचा छापा



या आठ आस्थापनांवर व्यवसाय बंदची कारवाई

अन्न परवाना किंवा नोंदणी नसल्याने नोटीस बजावण्यात आलेल्या आस्थापनांमध्ये पुढील व्यावसायिकांचा समावेश आहे.

1. मे. श्रीनाथ पिझ्झा अँड सँडविचेस (शंतनू राजवाडे), एन.सी.आर. हॉटेलजवळ, जे. एम. रोड.
2. मे. राज चायनीज फास्ट फूड, जे. एम. रोड.
3. मे. हिंदवी स्वराज्य, जंगली महाराज मंदिरासमोर, जे. एम. रोड.
4. मे. एव्हरेस्ट मोमोज, जे. एम. रोड खाऊ गल्ली.
5. मे. जय मल्हार भुर्जी सेंटर (संदीप शिरोळे), जे. एम. रोड खाऊ गल्ली.
6. मे. शोरमा सेंटर, खाऊ गल्ली, जे. एम. रोड.
7. मे. उत्कर्ष मंडळ लव्ह ज्यूस पॉईंट (मानव द्विजेन मंडळ), जंगली महाराज मंदिरासमोर, घोले रोड.
8. मे. साई ज्यूस, मिल्कशेक अँड सरबत सेंटर (महेश प्रकाश हिंगडे), जंगली महाराज मंदिरासमोर, घोले रोड.

पुणे (दै. आरंभ पर्व)

पुण्यातील खाद्यप्रेमींचे आकर्षण असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज नगर परिसरातील जंगली महाराज रस्त्यावरील (जे. एम. रोड) खाऊ गल्लीमध्ये अन्न व औषध प्रशासनाने (FDA) धडक तपासणी मोहीम राबवून अनियमितता आढळलेल्या आस्थापनांवर कठोर कारवाई केली आहे. वैध अन्न परवाना किंवा नोंदणी नसताना व्यवसाय सुरू ठेवणाऱ्या आठ आस्थापनांना तात्काळ व्यवसाय बंद करण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. तर स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी सहा आस्थापनांचे परवाने अथवा नोंदणी निलंबित करण्यात आल्याने खाऊ गल्लीतील व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' या मोहिमेअंतर्गत १८ नोव्हेंबर २०२६ रोजी पुणे विभागाच्या झोन-०२ पथकाने ही विशेष तपासणी मोहीम राबवली. जे. एम. रोडवरील खाऊ गल्ली, जंगली महाराज मंदिरासमोरील खाद्यपदार्थ विक्रीची ठिकाणे तसेच एन.सी.आर. हॉटेल परिसरातील एकूण १७ अन्न आस्थापनांची तपासणी करण्यात आली. या तपासणीदरम्यान अन्न व्यवसायासाठी आवश्यक असलेले वैध परवाने, नोंदणी, स्वच्छता आणि अन्न सुरक्षा नियमांचे पालन केले जात आहे की नाही, याची पाहणी करण्यात आली.

तपासणीमध्ये काही आस्थापनांकडून अन्न सुरक्षा व मानके कायद्याच्या तरतुदींचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले. विशेषतः वैध अन्न परवाना किंवा नोंदणी नसतानाही खाद्यपदार्थांची विक्री आणि व्यवसाय सुरू असल्याचे आढळले. अशा आठ आस्थापनांना प्रशासनाने तात्काळ व्यवसाय बंद करण्याच्या नोटिसा बजावल्या आहेत. या प्रत्येक आस्थापनावर १ लाख ३० हजार रुपयांप्रमाणे एकूण १० लाख ४० हजार रुपयांची दंडात्मक कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.


याशिवाय, तपासणीदरम्यान स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन आढळलेल्या सहा आस्थापनांचे अन्न व्यवसाय परवाने अथवा नोंदणी तात्काळ निलंबित करण्यात आले आहेत. तसेच नियमांमधील त्रुटी दूर करण्यासाठी अन्य दोन आस्थापनांना सुधारणा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ तसेच त्याअंतर्गत लागू असलेल्या नियमांनुसार ही कारवाई करण्यात आली आहे.

शहरातील प्रसिद्ध खाद्यपदार्थ विक्री केंद्रांमध्ये नागरिकांची आणि विशेषतः तरुणांची मोठी गर्दी असते. अशा ठिकाणी मिळणारे खाद्यपदार्थ सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार असणे आवश्यक आहे. खाद्यपदार्थ तयार करताना व साठवताना स्वच्छतेचे नियम पाळणे, आवश्यक अन्न परवाना किंवा नोंदणी घेणे तसेच अन्न सुरक्षा मानकांचे पालन करणे प्रत्येक व्यावसायिकासाठी बंधनकारक आहे.

या कारवाईमुळे जे. एम. रोड परिसरातील खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी नियमांचे पालन करण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचा स्पष्ट संदेश या मोहिमेतून प्रशासनाने दिला आहे.

महत्त्वाची संपादकीय दुरुस्ती : दिलेल्या मूळ मजकुरात दंडाच्या रकमेची गणिती चूक आहे. आठ आस्थापनांसाठी प्रत्येकी ₹१,३०,००० प्रमाणे एकूण रक्कम ₹१०,४०,००० (१० लाख ४० हजार रुपये) होते; ₹१२ लाख ४० हजार नाही. त्यामुळे बातमीत योग्य रक्कम घेतली आहे. तसेच सहा परवाने निलंबित आणि दोन सुधारणा नोटिसा या स्वतंत्र कारवाया आहेत.

थोडक्यात पण महत्वाचे



इंदिरा गांधी जयंतीनिमित्त खडकवासला काँग्रेसतर्फे अभिवादन

खडकवासला (आरंभ पर्व) : माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त धायरी येथे खडकवासला काँग्रेस कमिटीच्या वतीने अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस श्रीरंग चव्हाण पाटील यांच्या हस्ते स्व. इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करण्यात आली. जनसामान्यांच्या उन्नतीसाठी स्व. इंदिरा गांधी यांनी दूरदृष्टीने अनेक कल्याणकारी योजना राबविल्या. त्यांच्या दूरगामी निर्णयांमुळे देशाच्या विकासाला चालना मिळाली. त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी आहे, असे श्रीरंग चव्हाण पाटील यांनी सांगितले. यावेळी काँग्रेसचे पुणे जिल्हा सरचिटणीस श्रीकृष्ण बराटे, साहेबराव मते, पर्यावरण विभाग अध्यक्ष धनंजय पाटील,देवरज यादव आदी उपस्थित होते.



धारेश्वर प्रतिष्ठानच्या चव्हाण विद्यालयात व्याख्यानमालेचे आयोजन

धायरी (आरंभ पर्व) : धारेश्वर विद्या व क्रीडा प्रतिष्ठानच्या बंडोजी खंडोजी चव्हाण विद्यालय व ज्युनिअर कॉलेज आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बहिःशाल शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. व्याख्यानमालेच्या पहिल्या सत्रात व्याख्याते मुबीन तांबोळी यांनी 'तयारी जिंकण्याची' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वर्तमानातील प्रेरणादायी उदाहरणांचा आधार घेत त्यांनी यश मिळवण्यासाठी आवश्यक असलेली तयारी, आत्मविश्वास, जिद्द आणि योग्य दृष्टिकोन याबाबत विचार मांडले. त्यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना जिंकण्याची कला आणि यशासाठी स्वतःला तयार करण्याची प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाला संस्थेचे संचालक अनिकेत चव्हाण, सनदी लेखापाल हर्षदा चव्हाण, संस्थेचे मार्गदर्शक सल्लागार विद्यासागर सर, प्राचार्य विलास खाडे, शाखा विभागप्रमुख मदन सूर्यवंशी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, एनएसएस स्वयंसेवक तसेच विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष सोपान (काकासाहेब) चव्हाण यांनी व्याख्यानमालेस शुभेच्छा दिल्या. राजश्री घोडके यांनी वक्त्यांची ओळख करून दिली. श्वेता माळी यांनी सूत्रसंचालन केले, तर वृषाली शेजाळ यांनी आभार मानले. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणाऱ्या या व्याख्यानमालेतून विचारांची नवी दिशा आणि प्रेरणा मिळणार आहे.

२०० एमएलडी जलशुद्धीकरण प्रकल्पाला गती द्या

- सीडब्ल्यूपीआरएसची चार हेक्टर जागा हस्तांतरित करण्याची महापौर मंजुषा नागपुरे यांची केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांकडे मागणी



पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे शहरातील वाढती पाण्याची गरज लक्षात घेऊन खडकवासला येथे प्रस्तावित २०० एमएलडी क्षमतेच्या जलशुद्धीकरण प्रकल्पाला गती देण्याची मागणी महापौर मंजुषा नागपुरे यांनी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्याकडे केली. या प्रकल्पासाठी केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन संस्था (सीडब्ल्यूपीआरएस) यांची सुमारे चार हेक्टर जागा पुणे महानगरपालिकेला हस्तांतरित करण्याबाबत त्यांनी निवेदन दिले.

केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील आणि राज्यमंत्री डॉ. राज भूषण चौधरी यांच्या पुणे दौऱ्यादरम्यान महापौर मंजुषा नागपुरे यांनी केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री तथा पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत भेट घेतली. यावेळी पुण्याच्या पाणीपुरवठ्याशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. खडकवासला येथील सीडब्ल्यूपीआरएसमध्ये आयोजित राष्ट्रीय परिषद, 'जल संचय जन भागीदारी' उपक्रमाचा आढावा आणि सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या पाहणीदरम्यान ही मागणी मांडण्यात आली.

पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या १२ गावांमधील नागरिकांची पिण्याच्या पाण्याची वाढती गरज लक्षात घेऊन खडकवासला येथे आधुनिक जलशुद्धीकरण केंद्र उभारण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पाचा सुमारे ८९० कोटी रुपयांचा सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र सरकारच्या 'अर्बन चॅलेंज फंड'अंतर्गत मंजूर झाला आहे. मात्र, प्रकल्पासाठी आवश्यक असलेली सीडब्ल्यूपीआरएसची जागा हस्तांतरित होणे बाकी असल्याने जलशक्ती मंत्रालयाने त्यास तातडीने मंजुरी द्यावी, अशी मागणी महापौरांनी केली.

पुणे परिसरात दूषित पाण्यामुळे उद्भवलेल्या आरोग्यविषयक समस्यांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना शुद्ध व सुरक्षित पाणी पुरवणे गरजेचे असल्याचे महापौरांनी सांगितले. यापूर्वी गुलियन-बॅरे सिंड्रोमसारख्या गंभीर आजाराच्या घटनांनंतर भविष्यात आरोग्यविषयक धोके टाळण्यासाठी आधुनिक जलशुद्धीकरण प्रकल्प लवकर कार्यान्वित होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

खासदार मुरलीधर मोहोळ यांनीही पुणेकरांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी केंद्र सरकारकडे केलेल्या पत्रव्यवहाराचा संदर्भ देत प्रकल्पाची आवश्यकता मंत्र्यांसमोर मांडली. महापालिका आयुक्त नवल किशोर राम आणि अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी प्रकल्पाची तांत्रिक आवश्यकता, नियोजन व महत्त्व याबाबत सादरीकरण केले. यावेळी स्थानिक नगरसेविका धनश्री कोल्हे,मुख्य अभियंता मनीषा शेकटकर, अधीक्षक अभियंता संजय गायकवाड आणि कार्यकारी अभियंता कराळे यांनीही प्रकल्पाच्या सद्यस्थितीची व तांत्रिक बाबींची माहिती दिली.

दादर रेल्वे स्थानकालाच 'चैत्यभूमी' नाव द्या

रिपब्लिकन पक्षाची आग्रही मागणी



पुणे (दै. आरंभ पर्व)

दादर रेल्वे स्थानकाला 'चैत्यभूमी' हे नाव देण्याची घोषणा करून प्रत्यक्षात रेल्वे स्थानकाऐवजी मेट्रो स्टेशनला हे नाव देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतल्याने आंबेडकरी जनतेची फसवणूक झाली आहे. सरकारची ही भूमिका निषेधार्ह असून, दादर रेल्वे स्थानकाचेच नामकरण 'चैत्यभूमी' असे करण्यात यावे, अशी आग्रही मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांनी केली आहे. आम्ही महायुतीत असलो तरी सरकारने आम्हाला गृहीत धरू नये, असा इशाराही पक्षाच्या नेत्यांनी दिला. दादर रेल्वे स्थानकाऐवजी मेट्रो स्टेशनला 'चैत्यभूमी' नाव दिले जाणार असल्याचे स्पष्ट होताच पुणे शहर रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आंबेडकर पुतळा परिसरात राज्य सरकारच्या निर्णयाचा तीव्र निषेध करण्यात आला.

पुण्यात 'रेफकोल्ड इंडिया २०२६' प्रदर्शनाचे दिमाखात उद्घाटन

कोल्ड चेनच्या व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळणार - कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

२०० हून अधिक स्टॉल्समधून आधुनिक, ऊर्जा कार्यक्षम व पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचे सादरीकरण



पुणे (दै. आरंभ पर्व)

रेफ्रिजरेशन आणि कोल्ड चेन क्षेत्रातील दक्षिण आशियातील भव्य आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व परिषद 'रेफकोल्ड इंडिया २०२६'चे उद्घाटन महाराष्ट्राचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते ॲग्रिकल्चर कॉलेज ग्राउंड येथे झाले. इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग, रेफ्रिजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स (ISHRAE) यांच्या वतीने आयोजित या तीन दिवसीय प्रदर्शनात २०० हून अधिक स्टॉल्सच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञान, ऊर्जा कार्यक्षम प्रणाली आणि पर्यावरणपूरक उपाययोजनांचे सादरीकरण करण्यात आले आहे. यावेळी पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, विभागीय आयुक्त शीतल उगले-तेली, कृषी आयुक्त सुरेश मांढरे, साखर आयुक्त संजय कोलते, कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुभाष भालेकर, ISHRAEचे अध्यक्ष डॉ. सरवानन, रेफकोल्ड इंडिया २०२६चे अध्यक्ष अरविंद सुरंगे, सुनील पवार, अमन किर्लोस्कर, दीपक वाणी, रमेश परांजपे, चंद्रशेखर, संयोजक वीरेंद्र बोराडे आणि सहसंयोजक नंदकिशोर कोतकर आदी मान्यवर उपस्थित होते. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, की सर्वच क्षेत्रांत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ही काळाची गरज आहे. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाच्या साठवणुकीची योग्य व्यवस्था नसल्याने त्यांना अपेक्षित भाव मिळत नाही. कोल्ड चेन व्यवस्थेच्या विस्तारामुळे शेतकऱ्यांना भविष्यात मोठा आर्थिक लाभ होऊ शकतो. प्रदर्शने, उद्योग, तंत्रज्ञान आणि शासन यांनी एकत्रितपणे काम केल्यास उद्योगनिर्मितीला चालना मिळेल आणि नवउद्योजकांसाठी नवीन संधी निर्माण होतील. अरविंद सुरंगे म्हणाले, की रेफ्रिजरेशन आणि संलग्न उद्योगांतील उत्पादक कंपन्या, तज्ज्ञ अभियंते, डिझायनर्स, सल्लागार, कंत्राटदार आणि शैक्षणिक संस्थांचे भक्कम जाळे असल्यामुळे पुण्याला देशाची 'रेफ्रिजरेशन कॅपिटल' म्हणून ओळखले जाते. या क्षेत्राच्या विकासात ISHRAEच्या पुणे विभागाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

ISHRAEचे अध्यक्ष डॉ. सरवानन यांनी महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त नागरिकांच्या मदतीसाठी संस्थेतर्फे पाच लाख रुपयांची देणगी देण्याची तसेच तीन पीएच.डी. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची घोषणा केली.

या प्रदर्शनात रेफ्रिजरेशन, कोल्ड चेन, ऊर्जा कार्यक्षम प्रणाली, स्मार्ट तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक उपाययोजनांसह विविध उत्पादनांचे सादरीकरण करण्यात आले आहे. याशिवाय तज्ज्ञांची व्याख्याने, परिसंवाद, पॅनेल चर्चा, रेफकोल्ड पुरस्कार, ग्लोबल पोस्टर स्पर्धा तसेच महिला सदस्य आणि उद्योजकांसाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी श्री चेतन ठाकूर, डॉक्टर नितीन देवधर श्रीयुत अमित गुलवडे, विमल चावडा, आशुतोष जोशी, सुबोध मुर्केवार यांनी मोठे योगदान दिले. उद्घाटन सोहळ्याचे प्रास्ताविक वीरेंद्र बोराडे यांनी केले. सुभाष खनाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. हे प्रदर्शन २१ नोव्हेंबरपर्यंत दररोज सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत सर्वांसाठी खुले राहणार आहे.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६
३



थोडक्यात पण महत्वाचे



राष्ट्रीय कला अकादमीच्या दीपोत्सवात रांगोळ्यांनी खुलविले सौंदर्य!

पुणे (आरंभ पर्व) : राष्ट्रीय कला अकादमी न्यास, पुणे यांच्या वतीने आयोजित 'दीपावली पाडवा दीपोत्सव २०२६' हा सोहळा उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला. या निमित्ताने साकारण्यात आलेल्या आकर्षक व मनमोहक रांगोळ्यांनी परिसराचे सौंदर्य अधिकच खुलविले. रांगोळी कलाकारांच्या कलाकृतींनी उपस्थितांची मने जिंकली. या दीपोत्सवाला राष्ट्रीय कला अकादमी न्यासाचे संचालक, सहसंचालक, प्रशिक्षक व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच चतु:शृंगी देवस्थान ट्रस्टचे संचालक, लकडी पूल विठ्ठल मंदिराचे विश्वस्त दीपक थोरात, अखिल मंडई मंडळाचे विश्वस्त विश्वास भोर काका तसेच देवीचे भाविक यांची विशेष उपस्थिती लाभली. दीपप्रज्वलन, कलाविष्कार आणि सांस्कृतिक वातावरणामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. अकादमीच्या सर्व पदाधिकारी, कलाकार आणि सभासदांनी एकत्रित सहभागातून कला, संस्कृती व परंपरेचा सुंदर संगम घडवून आणला. या अविस्मरणीय दीपोत्सवामुळे दिवाळीचा आनंद द्विगुणित झाला.

'विठू माऊली माझी' अभंगवाणीचा भक्तिमय सोहळा

पुणे (आरंभ पर्व) : कार्तिकी एकादशीनिमित्त शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान, पुणे यांच्या वतीने 'विठू माऊली माझी' या अभंगवाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा या कार्यक्रमाचे २७ वे वर्ष असून, शनिवार, २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिर येथे हा भक्तिमय सोहळा रंगणार आहे. कार्यक्रमात गायक सुरजन खंडाळकर, प्रज्ञा देशपांडे आणि मयुरी अत्रे संतांच्या अभंगरचना व भक्तिगीते सादर करणार आहेत. त्यांना विविध वाद्यांवर नामवंत कलाकारांची साथ लाभणार असून, रविंद्र खरे निरूपण करणार आहेत. कार्यक्रमाचा प्रवेश विनामूल्य असून पहिल्या दोन रांगा राखीव असतील. विठ्ठलभक्ती, संतवाणी आणि संगीताचा आनंद घेण्यासाठी भाविक व संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक लक्ष्मीकांत खाबिया, विवेक थिटे, राहुल देशपांडे आणि नमोल खाबिया यांनी केले आहे.

जुन्नर नगरपरिषदेची विशेष सभा

- भाजी मंडईचा विकास, गोमांस प्रकरणासह कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा मुद्दा चर्चेला
- नगराध्यक्षा सुजाता काजळे यांनी बोलावली विशेष सभा;
- सहा महत्त्वपूर्ण विषयांवर होणार चर्चा,

जुन्नर शहर (आरंभ पर्व) : जुन्नर नगरपरिषदेची विशेष सभा सोमवार (दि. २३ नोव्हेंबर) रोजी दुपारी १ वाजता नगरपालिकेच्या धर्मवीर संभाजी महाराज सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. नगराध्यक्षा सुजाता मधुकर काजळे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सभेत शहरातील विविध नागरी प्रश्नांसह नगरपरिषदेच्या प्रशासकीय कामकाजाशी संबंधित सहा महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करून निर्णय घेतले जाणार आहेत. या सभेच्या विषयपत्रिकेत जुन्नर नगरपरिषदेच्या मालकीच्या महात्मा ज्योतिबा फुले भाजी मंडईचा विकास करण्याचा महत्त्वपूर्ण विषय समाविष्ट करण्यात आला आहे. भाजी मंडईच्या दोन्ही बाजूंना गेट बसविणे, मोजणी नकाशाप्रमाणे संरक्षण भिंत उभारणे, सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, पिण्याच्या पाण्याची व विजेची व्यवस्था करणे, शौचालयाची दुरुस्ती तसेच संपूर्ण मंडईला रंगरंगोटी करण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. तसेच शिवजन्मभूमी जुन्नर नगरपरिषद हद्दीत वारंवार गोमांस आढळणे आणि गोमांसाचे अवशेष सापडण्याचे प्रकार घडत असल्याच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणांमध्ये कठोर कारवाई करण्याबाबत चर्चा होणार आहे. नगरपरिषदेचे वरिष्ठ कर्मचारी बाळू दामू भोसले यांना १३ महिन्यांच्या कालावधीत जास्तीचे वेतन दिले गेल्याचा तसेच अंदाजे तीन लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कम अदा झाल्याचा मुद्दाही सभेच्या अजेंड्यावर आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता नगरपरिषद व महाराष्ट्र शासनाच्या नियमांचे उल्लंघन होऊन आर्थिक नुकसान झाल्याच्या मुद्द्यावर योग्य ती कारवाई करण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे.



कॉग्निझंटच्यावतीने चेन्नईमध्ये इमर्सिव्ह लर्निंग सेंटरचे अनावरण

चेन्नई (आरंभ पर्व) : कॉग्निझंट (NASDAQ: CTSH), एआय बिल्डर तसेच तंत्रज्ञान सेवा पुरवठादाराने आज चेन्नईतील सिरूसेरी कॅम्पसमध्ये कॉग्निझंट इमर्सिव्ह लर्निंग सेंटर (सीआयएलसी) च्या पहिल्या टप्प्याचे अनावरण केले. हे जागतिक स्तरावर ग्राहकांसाठी एआय-संचालित प्रभाव चालविण्यासाठी सुसज्ज प्रतिभा विकसित करण्याच्या कंपनीच्या वचनबद्धतेला बळकटी देते. भविष्यासाठी सज्ज (फ्यूचर-रेडी) शिकण्याचा अनुभव देण्यासाठी तयार केलेली सीआयएलसी समकालीन कार्यस्थळाची रचना, डिजिटल शिक्षण पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षक-नेतृत्वाखालील शिक्षण, सहकार्य आणि कल्पनांना समर्थन देणारे लवचिक वातावरण एकत्र आणते. अंदाजे 1,65,000 चौरस फुटांवर पसरलेल्या या सुविधेमध्ये 1,822 शिकण्याच्या जागांसह 58 वर्ग, 208 बहुउद्देशीय जागा (मल्टीपर्पज सीटस्), सहयोगी जागा (कोलॅबरेटीव्ह स्पेस), बैठकीची खोली (मीटिंग रूम), एक वर्क कॅफे, ग्रंथालय आणि लवचिक टाऊन हॉल जागा आहेत. सीआयएलसी'चा टप्प्याटप्प्याने विस्तार केला जाईल.

परदेशातील नोकरीचे स्वप्न ठरले संकट

- दुबईत अडकलेल्याची मोहोळ यांच्या प्रयत्नांतून सुटका
- हॉटेलमध्ये नोकरी अन् सव्वा लाख पगाराचे आमिष
- देहविक्रीसाठी दबाव, पासपोर्ट हिसकावून पाच लाखांची मागणी



पुणे (दै. आरंभ पर्व)

घरची परिस्थिती बदलावी, कुटुंबावरील कर्जाचा डोंगर हलका करावा, आपल्या माणसांना सुखाचे दिवस दाखवावेत... या आशेने एका व्यक्तीने परदेशात नोकरी करण्याचा निर्णय घेतला. दुबईत हॉटेलमध्ये नोकरी आणि महिन्याला सव्वा लाख रुपये पगाराचे स्वप्न दाखवण्यात आले. मात्र, भविष्याची स्वप्ने घेऊन दुबईत पोहोचताच भयावह वास्तव समोर आले. देहविक्रीसाठी दबाव, पासपोर्ट हिसकावून घेणे आणि पाच लाख रुपयांची मागणी करत डांबून ठेवण्याचा प्रकार घडला. अखेर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या प्रयत्नांतून संबंधित व्यक्तीची सुखरूप सुटका करण्यात आली. कुटुंबावर कर्जाचा बोजा आणि पती दिव्यांग असल्याने घराला हातभार लावण्यासाठी संबंधित महिला रोजगाराच्या शोधात होती. व्हॉट्सॲपवर संपर्कात आलेल्या एका व्यक्तीने दुबईतील हॉटेलमध्ये नोकरी आणि आकर्षक पगाराचे आमिष दाखवले. घरच्या परिस्थितीला हातभार लागेल, कुटुंबाला आधार देता येईल, या अपेक्षेने तिने परदेशात जाण्याचा निर्णय घेतला. मात्र, दुबईत पोहोचल्यानंतर तिच्या स्वप्नांचा चुराडा झाला. तिला देहविक्रीच्या व्यवसायात ढकलण्याचा प्रयत्न करण्यात आला. तिने विरोध केल्यानंतर पाच लाख रुपयांची मागणी करण्यात आली. पासपोर्ट काढून घेत तिला डांबून ठेवण्यात आले.

एका बाजूला दुबईत अडकलेली महिला मदतीच्या प्रतीक्षेत होती, तर दुसरीकडे तिच्या कुटुंबीयांची चिंता वाढत होती. अखेर महिलेच्या पतीने मुरलीधर मोहोळ यांच्या जंगली महाराज रस्त्यावरील कार्यालयात धाव घेत मदतीची विनंती केली. पत्नी परदेशात अडकली आहे, तिचा पासपोर्ट काढून घेतला असून तिच्यावर अन्याय होत असल्याची माहिती त्यांनी दिली. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेत मोहोळ यांच्या कार्यालयाने तातडीने महिलेशी संपर्क साधला आणि तिच्या सुटकेसाठी हालचाली सुरू केल्या.

परराष्ट्र मंत्रालय, दुबईतील भारतीय वाणिज्य दूतावास, संयुक्त अरब अमिरातीतील महाराष्ट्र सरकारचे प्रतिनिधी आणि आयपीएफ महाहेल्पलाईनचे प्रमुख राहुल तुळपुळे यांच्या समन्वयातून सुटकेचे प्रयत्न करण्यात आले. अखेर संकटात सापडलेल्या या महिलेला मायदेशी परत आणण्यात यश आले.

या घटनेने परदेशात नोकरीच्या नावाखाली महिलांना फसवणाऱ्या टोळ्यांचे धोकादायक वास्तव पुन्हा समोर आणले आहे. अशा प्रकारे आणखी किती महिला आमिषांना बळी पडत असतील, हा प्रश्नही उपस्थित होत आहे. या प्रकरणामागे मोठे रॅकेट सक्रिय असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून, सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी मुरलीधर मोहोळ यांनी पुणे पोलीस आयुक्तांना पत्राद्वारे केली आहे.

परदेशात नोकरीच्या शोधात निघालेल्या प्रत्येक महिलेने सावध राहण्याची गरज या घटनेने अधोरेखित केली आहे. कारण नोकरीच्या आमिषाने दाखवलेली स्वप्ने कधी कधी आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या सापळ्यात बदलू शकतात.

हृदयस्पर्शी कथा, आता स्ट्रीमिंग हिंदी Zee 5वर

पुणे (दै. आरंभ पर्व)

प्रेम, स्वप्नं आणि जीवन क्वचितच योजनेनुसार चालते. तारुण्यातील प्रणय, महत्त्वाकांक्षा आणि अनपेक्षित वळणे यांना एकत्र आणणारा 'तीन तिगाडा' आता हिंदी Zee 5 वर स्ट्रीम होत आहे. संगीत आणि क्रिकेटच्या जगावर आधारित, हे आगामी नाट्य दोन तरुण व्यक्तींचे प्रेम आणि त्यांच्या आकांक्षांवर आधारित आहे. जे केवळ त्यांच्या भविष्यासाठी त्यांनी कल्पना केलेल्या प्रत्येक गोष्टीला आव्हान देणाऱ्या जीवन बदलणाऱ्या परिस्थितीचा सामना करताना दिसतात. प्रसन्ना बिष्त, दानेश रजवी, अर्चना अरोरा, समर्थ मेहता आणि ग्रुशा कपूर यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या 'तीन तिगाडा'ची निर्मिती स्ट्रीटलॅम्प मीडिया एंटरटेनमेंट एलएलपी आणि आय स्क्रीम ड्रीम्स मीडिया प्रायव्हेट लिमिटेड यांनी केली आहे. या मालिकेच्या केंद्रस्थानी आहेत प्रसन्ना बिष्त हिने साकारलेली आस्मानी आणि दानेश रझवी याने साकारलेला मनन.



टोल कंपन्यांच्या वसुलीचा संपूर्ण हिशोब वाहनधारकांना एसएमएसद्वारे द्या!

- टोल कंपन्यांच्या पारदर्शक कारभारासाठी नितीन गडकरी यांच्याकडे नागरिकांची मागणी
- वाहनधारकांच्या खिशातून पैसे काढण्याच्या धोरणावर संताप

बारामती (दै. आरंभ पर्व)

देशातील महामार्गांवर प्रवास करताना वाहनधारकांकडून मोठ्या प्रमाणावर टोल वसूल केला जातो. मात्र, ज्या टोल कंपन्यांना महामार्ग उभारणी आणि देखभालीसाठी टोल वसुलीचे अधिकार देण्यात आले आहेत, त्या कंपन्यांनी आतापर्यंत किती खर्च केला, किती रक्कम वसूल केली आणि आणखी किती रक्कम वसूल करणे बाकी आहे, याची स्पष्ट माहिती सामान्य वाहनधारकांना का दिली जात नाही? असा संतप्त सवाल एका जागरूक नागरिकाने सोशल मीडियाच्या माध्यमातून उपस्थित केला आहे.केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी साहेब यांनी देशातील प्रत्येक टोल नाक्यावर पारदर्शक यंत्रणा सुरू करावी. प्रत्येक वाहनधारकाने टोल भरल्यानंतर त्याच्या मोबाईलवर एसएमएसद्वारे किती टोल आकारला गेला, संबंधित टोल कंपनीने आतापर्यंत किती रक्कम वसूल केली, महामार्गासाठी झालेला एकूण खर्च किती आणि करारानुसार आणखी किती रक्कम वसूल करणे बाकी आहे, याची माहिती मिळावी, अशी मागणी या नागरिकाने केली आहे.

टोल कंपन्यांना दिलेल्या वसुलीच्या मुदतीचा आणि आर्थिक व्यवहारांचा संपूर्ण हिशोब जनतेसमोर येणे गरजेचे आहे. महामार्ग उभारणीचा खर्च वसूल झाल्यानंतरही टोल वसुली सुरू असल्यास त्याबाबतही वाहनधारकांना स्पष्ट माहिती मिळाली पाहिजे. जनतेच्या पैशातून उभ्या राहणाऱ्या सुविधांचा हिशोब जनतेलाच मिळत नसेल, तर पारदर्शकतेचा अर्थ काय? असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला आहे. वाहनधारकांच्या खिशातून सतत पैसे काढण्याऐवजी टोल वसुलीचा संपूर्ण हिशोब जनतेसमोर ठेवा. स्वतःच्या आणि टोल कंपन्यांच्या फायद्यासाठी सामान्य नागरिकांवर आर्थिक भार टाकला जात असल्याची भावना वाहनधारकांमध्ये निर्माण होत आहे. या व्यवस्थेत पारदर्शकता नसेल तर जनतेचा विश्वास कसा टिकणार? असा संतप्त सवाल या पोस्टमधून करण्यात आला आहे.

नितीन गडकरी साहेब, केवळ टोल वसुलीची सुविधा आधुनिक करण्यापेक्षा टोल वसुलीचा हिशोबही आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रत्येक वाहनधारकापर्यंत पोहोचवा. वाहनधारकांना माहिती मिळण्याचा अधिकार आहे. टोल वसुलीच्या संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी सोशल मीडियावरून जोर धरत आहे.

एका त्रस्त वाहनधारकाची ही व्यथा सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे. हेडलाईन: "टोल भरतो आम्ही, मग हिशोब लपवता कशाला? प्रत्येक वाहनधारकाला एसएमएसद्वारे टोलचा लेखाजोखा द्या!"

संवाद, संस्कार आणि कौटुंबिक नात्यांना प्राधान्य द्या!

पुणे (दै. आरंभ पर्व)

आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानप्रधान युगात मोबाईल हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. माहिती, शिक्षण आणि मनोरंजनाचे प्रभावी साधन म्हणून मोबाईलचे महत्त्व नाकारता येणार नाही. मात्र, याच मोबाईलच्या अतिवापरामुळे लहान मुलांपासून किशोरवयीन मुलांपर्यंत अनेक मुले स्क्रीनच्या आहारी जात असल्याचे चिंताजनक चित्र दिसून येत आहे. ही बाब केवळ पालकांसाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी चिंतनाचा विषय बनली आहे.

एकेकाळी घराघरांत आजी-आजोबांच्या गोष्टी, कुटुंबातील हास्यविनोद, एकत्र बसून जेवण, मित्रांसोबतचे मैदानी खेळ आणि पाहुण्यांचे आनंदाने स्वागत असे जिव्हाळ्याचे वातावरण असायचे. या छोट्या-छोट्या गोष्टींतून मुलांवर संस्कार घडत असत. नाती जपण्याची, मोठ्यांचा आदर करण्याची आणि माणसांशी संवाद साधण्याची शिकवण त्यांना घरातूनच मिळत होती. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. अनेक घरांमध्ये मुले मोबाईल गेम्स, यूट्यूब आणि सोशल मीडियामध्ये गुंतलेली दिसतात. घरात पाहुणे आले तरी त्यांच्याशी संवाद साधण्याऐवजी मुले मोबाईलमध्ये व्यस्त असतात. आई-वडिलांशी मनमोकळेपणाने बोलणे, घरातील छोट्या-मोठ्या जबाबदाऱ्या समजून घेणे आणि सामाजिक नात्यांमध्ये सहभागी होणे याकडे दुर्लक्ष होत आहे. मोबाईलच्या आभासी जगात रमलेली ही पिढी प्रत्यक्ष जगातील माणसांपासून हळूहळू दूर जात आहे. या परिस्थितीसाठी केवळ मुलांना दोष देऊन चालणार नाही. पालकांनीही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. मुलांसमोर आपण स्वतः किती वेळ मोबाईल वापरतो? जेवताना, कुटुंबासोबत बसताना किंवा मुलांशी बोलताना आपले लक्ष मोबाईलमध्ये तर नसते ना? मुलांना ज्या सवयी लावायच्या आहेत, त्यांचे उदाहरण सर्वप्रथम पालकांनी स्वतःच्या वर्तनातून घालून दिले पाहिजे.

मुलांना मोबाईलपासून दूर ठेवण्यासाठी केवळ बंधने लादणे हा कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही. त्याऐवजी त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संवाद साधणे, त्यांच्या भावना समजून घेणे आणि त्यांच्या आवडी-निवडींना योग्य दिशा देणे अधिक महत्त्वाचे आहे. दररोज काही वेळ मुलांसाठी राखून ठेवणे, एकत्र जेवण करणे, मैदानी खेळ खेळणे, पुस्तकांचे वाचन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि कौटुंबिक गप्पा यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. मोबाईल हे ज्ञानाचे आणि प्रगतीचे साधन आहे; मात्र त्याचा अतिरेक मुलांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि भावनिक विकासावर विपरीत परिणाम करू शकतो. त्यामुळे मुलांच्या वयानुसार स्क्रीन टाइमची मर्यादा निश्चित करणे, इंटरनेटवरील आशयावर लक्ष ठेवणे आणि डिजिटल साधनांचा योग्य वापर शिकवणे ही काळाची गरज आहे. आज मुलांच्या हातातील मोबाईल काढून घेण्यापेक्षा त्यांच्या मनातील अंतर कमी करण्याची अधिक आवश्यकता आहे. मुलांना महागड्या खेळण्यांपेक्षा आणि आधुनिक गॅझेट्सपेक्षा आई-वडिलांचा सहवास, प्रेमाचे दोन शब्द, आजी-आजोबांचे अनुभव, कौटुंबिक जिव्हाळा आणि योग्य संस्कार अधिक समृद्ध करतात.

कारण मुलांचे बालपण मोबाईलच्या स्क्रीनवर नव्हे, तर कुटुंबाच्या प्रेमळ सहवासात फुलले पाहिजे! चला, मोबाईलच्या आहारी जाणाऱ्या नव्या पिढीला संवादाची, संस्कारांची, सामाजिक बांधिलकीची आणि माणुसकीची खरी ओळख करून देऊया!

- समाजप्रेरक सुजाताताई गुरव



यवतमधे महिला प्रवासी व लहान मुलांचे प्रचंड हाल

दौंड -विनायक दोरगे
(दै. आरंभ पर्व)

यवत येथील पुणे सोलापूर महामार्गावर एस टी बस थांबत नसल्याने प्रवाशांचे आतोनात हाल होत आहेत. दिवाळीच्या सुट्ट्या संपल्यानंतर परतीच्या प्रवासाला निघालेल्या महिला व लहान मुलांना मुख्य महामार्गाच्या आत मधील बाजुला जीव धोक्यात घालून उन्हात ताटकळत तासंतास उभे राहुन एस टीची वाट पाहत उभे रहावे लागत आहेत. यवत येथे उन्हात प्रवासी एस टी बसला हात दाखवुन देखील एस टी चालक दुर्लक्ष करत नथांबता सुसाट निघून जात असल्याचे चित्र नेहमीच दिसत असते. पाच गाड्यांमागे एखादी गाडी थांबते. आणि रात्रीच्या वेळेस तर अक्षरशः दोन दोन तास एस टी बस थांबत नसल्याचे प्रवाशांनी सांगितले. यावेळी प्रवाशांना गाडी थांबवण्यास सामाजिक कार्यकर्ते काँ.अध्यक्ष अरविंद दोरगे यांनी मदत केली. यावेळी योगायोगाने एस टी महामडंळाचे भरारी पथक तिथे आल्याने संबंधीत अधिकारी यांच्या बरोबर अरविंद दोरगे ,रा काँ जि,उपाध्यक्ष दिपक दोरगे ,मातंग नवनिर्माण सेना तालुका अध्यक्ष काळुराम शेंडगे,विष्णू बोडके यांनी चर्चा केली व इथुन पुढे प्रवासी व विद्यार्थी यांना एस टी महामंडळांकडून योग्य ते सहकार्य मिळावे नाहीतर आंदोलनाचा इशारा यावेळी देण्यात आला. तसेच प्रवाशांसाठी लवकरात लवकर सुरक्षित उभे राहण्यासाठी एस टी स्थानक उभारण्यासाठी पाठपुरावा केला जाणार असल्याचे संबंधितांकडून यावेळी सांगण्यात आले.



उरुळी कांचन ग्रामपंचायतीत विधी सेवा शिबिर उत्साहात

उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)

सर्वसामान्य नागरिकांना कायदेशीर हक्क, अधिकार आणि न्यायव्यवस्थेतील उपलब्ध सुविधांची माहिती मिळावी, या उद्देशाने एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लॉ, उरुळी कांचन ग्रामपंचायत आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत कार्यालयात विधी सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरामध्ये उपस्थित मान्यवरांनी नागरिकांना विविध कायदेशीर तरतुदी, मूलभूत हक्क, न्याय मिळविण्याची प्रक्रिया तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत उपलब्ध होणाऱ्या मोफत कायदेशीर सहाय्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी ग्रामस्थांनी वैयक्तिक तसेच स्थानिक पातळीवरील विविध कायदेशीर समस्या मांडल्या. उपस्थित विधिज्ञांनी या प्रश्नांचे स्वरूप समजून घेत योग्य कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन केले. त्यामुळे नागरिकांना आपल्या समस्यांवर कायदेशीर मार्गाने तोडगा काढण्यासाठी महत्त्वपूर्ण दिशा मिळाली. या कार्यक्रमाला उरुळी कांचनचे सरपंच मिलिंद जगताप, यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक संतोष कांचन, ग्रामविकास अधिकारी पाटील, मोजणी अधिकारी सतीश कुदळे, हवेली तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या व्हीजेएनटी सेलचे अध्यक्ष दिलीप गाडेकर, माजी ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र टिळेकर, स्कूल ऑफ लॉचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. गोविंद राजपाल, प्रा. आदित्य केदारी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लॉमधील विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला. एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष तथा प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या प्रेरणेने आणि सरपंच मिलिंद जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची जाणीव करून देणे आणि न्यायव्यवस्थेपर्यंत पोहोचण्याचा मार्ग सुलभ करणे, या दृष्टीने अशा विधी सेवा शिबिरांचे महत्त्व अधोरेखित झाले.

या उपक्रमाबद्दल ग्रामस्थांनी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड आणि सरपंच मिलिंद जगताप यांचे आभार व्यक्त केले.

थोडक्यात पण महत्वाचे



रोबोटिक हृदय शस्त्रक्रियेत भारताची ऐतिहासिक जागतिक कामगिरी

पुणे (आरंभ पर्व) : वैद्यकीय विज्ञान आणि रोबोटिक हृदय शस्त्रक्रियेच्या क्षेत्रात भारताने जागतिक स्तरावर एक नवा इतिहास घडवला आहे. गुरुग्राम येथील मेदांता रुग्णालयात स्वदेशी एसएसआय मंत्रा सर्जिकल रोबोटिक सिस्टीमच्या मदतीने जगातील पहिली ड्युअल-कन्सोल आणि पाच रोबोटिक आर्म्सचा वापर करून धडधडत्या हृदयावर टोटली एंडोस्कोपिक कोरोनरी आर्टरी बायपास शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडली गेली. या अत्यंत गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण प्रक्रियेदरम्यान रुग्णाचे हृदय नैसर्गिकरीत्या धडधडत होते आणि हार्ट-लंग मशीनचा वापर करण्यात आला नाही. ही ऐतिहासिक शस्त्रक्रिया मेदांता, गुरुग्राम येथील रोबोटिक आणि मिनिमली इनवेसिव्ह कार्डियाक सर्जन डॉ. नितीन कुमार राजपूत आणि मणिपाल हॉस्पिटल, जयपूर येथील चीफ कार्डियाक सर्जन डॉ. ललित मलिक यांनी संयुक्तपणे पार पाडली. या संपूर्ण प्रक्रियेचे पर्यवेक्षण रोबोटिक शस्त्रक्रिया क्षेत्रातील अग्रणी तज्ज्ञ आणि एसएस इनोवेशन्स इंटरनॅशनलचे संस्थापक, अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुधीर पी. श्रीवास्तव यांनी केले.

श्री हिरोयुकी ताओ यांची व्यवस्थापकीय संचालक पदी नियुक्ती



गुरुग्राम (आरंभ पर्व) : जपानचा तोशिबा ग्रुप आणि भारताचा जेएसडब्ल्यू ग्रुप यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या तोशिबा जेएसडब्ल्यू पॉवर सिस्टम्स प्रायव्हेट लिमिटेडने आज श्री हिरोयुकी ताओ यांची आपले नवे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती केल्याची घोषणा केली. श्री ताओ यांनी होक्काइडो विद्यापीठातून मेकॅनिकल इंजिनीअरिंगमधील पदवी प्राप्त केली असून ते १९९३ मध्ये तोशिबा ग्रुपमध्ये रुजू झाले. तोशिबा ग्रुपमधील तीन दशकांहून अधिक वर्षांच्या अनुभवासह, श्री ताओ यांनी थर्मल पॉवर इंजिनीअरिंग, परदेशातील ऊर्जा प्रकल्प, ईपीसी प्रकल्प अंमलबजावणी, अभियांत्रिकी व्यवस्थापन आणि प्रकल्प व्यवस्थापन या क्षेत्रांत सखोल कौशल्य विकसित केले आहे. आपल्या कारकिर्दीत श्री ताओ यांनी तोशिबा कॉर्पोरेशन आणि तिच्या उपकंपन्यांमध्ये विविध नेतृत्वाची पदे भूषवली आहेत. श्री ताओ यांची आता तोशिबा जेएसडब्ल्यूच्या व्यवस्थापकीय संचालक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. परदेशातील ऊर्जा प्रकल्प आणि ईपीसी अंमलबजावणीतील आपल्या प्रदीर्घ अनुभवाच्या बळावर, श्री ताओ अभियांत्रिकीपासून ते प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत गुंतागुंतीच्या ऊर्जा प्रकल्पांचे व्यवस्थापन करण्याबाबत मौल्यवान दृष्टिकोनाचे योगदान देतील. त्यांचा हा अनुभव वीजनिर्मिती उपकरणे, देखभाल सेवा आणि डिजिटल सोल्यूशन्स या क्षेत्रांतील तोशिबा जेएसडब्ल्यूच्या वाढीस बळ देईल, तसेच भारताच्या ऊर्जा क्षेत्रातील ग्राहकांच्या बदलत्या गरजा आणि उदयोन्मुख संधींना प्रतिसाद देण्यास कंपनीला मदत करेल.



भारत जागतिक मोबिलिटी आणि प्रगत उत्पादन क्षेत्राचे केंद्र बनण्यास सज्ज!


पुणे (आरंभ पर्व) : स्वदेशी नवोन्मेष, आधुनिक तंत्रज्ञान, शाश्वत उत्पादन प्रक्रिया आणि उद्योग क्षेत्रातील परस्पर सहकार्याच्या बळावर भारत पुढील पिढीतील मोबिलिटी आणि प्रगत उत्पादन क्षेत्रात जागतिक केंद्र म्हणून उदयास येण्यास सज्ज झाला आहे. भारताकडे जागतिक वाहन उद्योगाच्या परिवर्तनाचे नेतृत्व करण्याची क्षमता असून, त्यासाठी संशोधन, तंत्रज्ञान विकास आणि देशांतर्गत उत्पादन क्षमता वाढविण्यावर भर देणे आवश्यक असल्याचे मत उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले. पुण्यातील ऑटो क्लस्टर एक्झिबिशन सेंटर येथे गुरुवारी चौथ्या 'सीआयआय नेक्सजेन मोबिलिटी शो २०२६' आणि 'सीआयआय सरफेस कोटिंग शो २०२६'चे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी उद्योग क्षेत्रातील मान्यवरांनी भारताच्या भविष्यातील मोबिलिटी आणि उत्पादन क्षेत्रातील संधी, आव्हाने तसेच जागतिक स्पर्धात्मकतेविषयी आपली मते मांडली. उद्घाटनप्रसंगी सीआयआय पश्चिम विभागाचे २०२६-२७ चे अध्यक्ष तथा ब्लू स्टार लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक वीर एस. अडवाणी, सीआयआय पश्चिम विभाग सरफेस कोटिंग शो २०२६ आयोजन समितीचे अध्यक्ष आणि आयआयटी मुंबईच्या मेटलर्जिकल इंजिनिअरिंग अँड मटेरियल्स सायन्स विभागाचे प्राध्यापक डॉ. स्मृतिरंजन परिदा, सिद्धार्थ ऑटोमॅट इंडिया प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक सुरेंदर यादव, प्रिझम सरफेस कोटिंग्स प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक प्रीतम कुमार गणेशन, टेकएक्सपर्ट इंजिनिअरिंग प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक जे. व्ही. इंगळे तसेच सीआयआय पश्चिम विभाग फ्युचर मोबिलिटी समितीचे सह-अध्यक्ष आणि आरएसबी ट्रान्समिशन्स (इंडिया) लिमिटेडचे कार्यकारी संचालक रजनीकांत बेहेरा उपस्थित होते. ही दोन्ही प्रदर्शने १९ ते २१ नोव्हेंबरदरम्यान आयोजित करण्यात आली आहेत. यामध्ये वाहन उद्योगातील आघाडीच्या कंपन्या, उत्पादक आणि तंत्रज्ञान पुरवठादार सहभागी झाले आहेत. इलेक्ट्रिक मोबिलिटी, ऑटोमोटिव्ह तंत्रज्ञान, प्रगत कोटिंग्स, सरफेस इंजिनिअरिंग आणि इंटेलिजंट मॅन्युफॅक्चरिंगमधील आधुनिक तंत्रज्ञान व नावीन्यपूर्ण संकल्पना या प्रदर्शनांमध्ये मांडण्यात आल्या आहेत. यासोबत आयोजित करण्यात आलेल्या शिखर परिषदांमध्ये उत्पादन क्षेत्रातील स्थानिकीकरण, सक्षम पुरवठा साखळी, डिजिटल परिवर्तन आणि शाश्वत उत्पादन प्रक्रिया या महत्त्वाच्या विषयांवर विचारमंथन होणार आहे.

जुन्नरच्या भाजीपाला बाजारावरील कारवाई केवळ दिखावा?

अतिक्रमण हटविल्यानंतर दुसऱ्याच दिवशी व्यापाऱ्यांचे पुन्हा त्याच जागी बस्तान; ठेकेदारांची वसुली मात्र जोरात!

जुन्नर- मारुती मिंढे
(दै. आरंभ पर्व)

जुन्नर शहरातील बाजार समितीच्या पूर्व भागात असलेल्या भाजीपाला बाजारावर जुन्नर नगरपरिषदेच्या वतीने नुकतीच अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान संबंधित व्यापाऱ्यांना हटवून त्यांचे स्थलांतर नगरपरिषदेच्या भाजीपाला संकुलात करण्यात आले होते. मात्र, या कारवाईला एक दिवसही पूर्ण होत नाही तोच किरकोळ भाजीपाला विक्रेत्यांनी पुन्हा त्याच जुन्या जागेवर आपले बस्तान बसविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे नगरपरिषदेची अतिक्रमणविरोधी कारवाई नेमकी किती प्रभावी आहे, असा प्रश्न जुन्नरकर नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. नगरपरिषदेने संबंधित ठिकाणी अतिक्रमण करणाऱ्या व्यावसायिकांवर



दंडात्मक कारवाई करण्यात येईल, तसेच त्यांचा माल जप्त केला जाईल, अशा आशयाचे इशारा फलक लावले आहेत. मात्र, प्रत्यक्षात त्याच जागेवर पुन्हा विक्रेत्यांचे व्यवसाय सुरू होत असल्याने या फलकांवरील इशारे केवळ दिखाव्यापुरतेच आहेत का, असा सवाल नागरिक करीत आहेत.

विशेष म्हणजे, नगरपरिषदेने कारवाई करून व्यापाऱ्यांचे स्थलांतर केले असतानाही त्याच ठिकाणी पुन्हा भाजीपाला विक्री सुरू झाली आहे. दुसरीकडे, संबंधित ठेकेदारांकडून या व्यावसायिकांकडून पैसे वसूल केले जात असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

अतिक्रमण रोखण्याची जबाबदारी असताना अशा प्रकारे वसुली होत असल्याचे आरोप समोर येत असतील, तर नगरपरिषद प्रशासनाने त्याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांचे या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. एका बाजूला अतिक्रमण हटविण्याची कारवाई करायची आणि दुसऱ्या बाजूला त्याच जागेवर पुन्हा व्यवसाय सुरू होण्यास मोकळीक द्यायची, ही विसंगती नगरपरिषदेच्या कारवाईच्या उद्देशावरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. या संपूर्ण प्रकारामागे काही आर्थिक व्यवहार आहेत का, अशी चर्चाही सुरू आहे. मात्र, या आरोपांची निष्पक्ष चौकशी होऊन वस्तुस्थिती समोर येणे गरजेचे आहे. नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी या संपूर्ण प्रकरणाची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांकडून खुलासा मागवावा. तसेच अतिक्रमण करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करून भाजीपाला बाजाराचे स्थलांतर प्रभावीपणे आणि कायमस्वरूपी राबवावे, अशी अपेक्षा जुन्नरकर नागरिक व्यक्त करीत आहेत. कारवाईचा केवळ गाजावाजा नको, तर प्रत्यक्ष अंमलबजावणी हवी!

मुख्याधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालण्याची मागणी

जुन्नर शहरातील वाढती वाहतूक कोंडी, बाजारपेठेतील बेशिस्त आणि नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेता भाजीपाला बाजाराचे योग्य नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. नगरपरिषदेने स्थलांतरित केलेला बाजार पुन्हा जुन्या जागेवर भरत असेल, तर केवळ तात्पुरती कारवाई करून प्रश्न सुटणार नाही. त्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे आहे. संबंधित ठेकेदारांची वसुली, त्यांना देण्यात आलेले अधिकार आणि अतिक्रमणाबाबतची त्यांची भूमिका यांची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

एअरटेलचा 'ट्रॅव्हल वीक' उपक्रम सुरू; आकर्षक ऑफर्स

नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

सणासुदीच्या आणि हिवाळी पर्यटनाच्या पार्श्वभूमीवर भारती एअरटेलने ग्राहकांसाठी 'एअरटेल ट्रॅव्हल वीक' हा विशेष उपक्रम सुरू केला आहे. १९ ते २५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत एअरटेल ॲपवर उपलब्ध असलेल्या या उपक्रमांतर्गत आंतरराष्ट्रीय रोमिंग, व्हिसा प्रक्रिया, परकीय चलन आणि प्रवास नियोजन अशा विविध सुविधा एकाच प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या उपक्रमातील प्रमुख आकर्षण म्हणजे प्रीपेड आणि पोस्टपेड अशा दोन्ही प्रकारच्या प्रत्येकी एक हजार ग्राहकांना इंटरनॅशनल रोमिंग पॅकवर १० टक्के सूट मिळणार आहे. याशिवाय, ग्राहकांना 'आउट ऑफ ऑफिस कॉन्टेस्ट'मध्ये सहभागी होऊन आपला सर्वाधिक कल्पक सुट्टीचा ई-मेल सादर करता येणार आहे. या स्पर्धेतील दोन भाग्यवान विजेत्यांना संपूर्ण खर्च भरलेली आंतरराष्ट्रीय सहल जिंकण्याची संधी मिळणार आहे. व्हिसा अर्जदारांसाठीही विशेष सवलत देण्यात आली आहे. ॲटलिसच्या माध्यमातून पात्र आशियाई



पर्यटनस्थळांसाठी पुढील व्हिसा अर्जावर १०० टक्के सूट, म्हणजेच कमाल चार हजार रुपयांपर्यंतचा लाभ मिळू शकतो. परदेश प्रवासासाठी आर्थिक व्यवहार सुलभ व्हावेत, यासाठी नियो मल्टीकरन्सी कार्ड झिरो मार्कअप आणि मोफत डिलिव्हरीसह उपलब्ध असेल. तसेच विशेष दरांमध्ये नियो फॉरेक्स कॅश घरपोच मिळवण्याची सुविधाही देण्यात आली आहे.

प्रवासाचे नियोजन अधिक वैयक्तिक आणि सोयीस्कर करण्यासाठी एअरटेलने 'ब्लूइड पासपोर्ट्स'सोबत भागीदारी केली आहे. याअंतर्गत पाच भाग्यवान ग्राहकांना प्रवास तज्ज्ञांसोबत वैयक्तिक ऑनलाइन सल्लामसलत करण्याची संधी मिळेल. ग्राहकांच्या आवडीनिवडी आणि प्रवासाच्या योजनांनुसार पर्यटनाचा आराखडा तयार करण्यात तज्ज्ञ मदत करणार आहेत.

दिवाळी सुट्टीतही आंबेगाव तालुक्यात स्पर्धा परीक्षांचा धडाका

- वळती केंद्रातील ११ पैकी ८ शाळांमध्ये शिष्यवृत्ती वर्ग सुरू

पारगाव शिंगवे (दै. आरंभ पर्व)

आंबेगाव तालुक्यामध्ये शिष्यवृत्ती, नवोदय, इस्रो-नासा, सैनिकी शाळा आदी स्पर्धा परीक्षांची प्रत्येक शाळेमध्ये नियोजनबद्ध तयारी चालू आहे. आंबेगाव तालुक्यामध्ये गटशिक्षणाधिकारी रूपाली धोका यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विस्तार अधिकारी व सर्व केंद्रप्रमुख यांनी केलेल्या नियोजनबद्ध उपक्रमांमुळे यावर्षी जिल्ह्यामध्ये आंबेगाव तालुका शिष्यवृत्तीधारक संख्येत तृतीय क्रमांकावर मिळाला.

गटशिक्षणाधिकारी श्रीमती रूपाली धोका यांनी अचानक वळती केंद्रातील विविध शाळांना भेटी दिल्या. यावेळी त्यांच्यासोबत केंद्रप्रमुख राजू जाधव उपस्थित होते. वळती शाळेमध्ये इयत्ता चौथी,पाचवी आणि सातवीचे शिष्यवृत्ती व नवोदय वर्ग चालू असल्याचे पाहून रुपाली धोका यांनी समाधान व्यक्त केले. देविदास शेळके संतोष जाधव भोकरवस्ती शाळेतील मुख्याध्यापिका स्नेहल लोखंडे यांचा वर्ग अतिशय चांगल्या



"दिवाळी सुट्टीमध्येही वळती केंद्रातील शिक्षक उत्साहाने अध्यापनाचे काम करत असल्याचे पाहून अतिशय समाधान वाटले. ११ पैकी ८ शाळांमध्ये शिष्यवृत्ती-नवोदय वर्ग सुरू आहेत, ही खूप अभिमानाची बाब आहे. शिक्षकांच्या या मेहनतीमुळेच आंबेगाव तालुका जिल्ह्यात तृतीय क्रमांकावर मिळाला. सर्व शिक्षकांचे मी कौतुक करते.
- रूपाली धोका, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती आंबेगाव.

पद्धतीने चालू असल्याचे दिसले. भागडी शाळेमध्ये बाळासाहेब गिलबिले व लालन गायकवाड यांचे चौथी व सातवीचे शिष्यवृत्ती वर्ग चालू होते. जिल्हा परिषद मॉडेल स्कुल शिंगवे शाळेतील चौथी,पाचवी व सातवी तिन्ही वर्गांचे शिष्यवृत्ती-नवोदय वर्ग चालू असुन यावेळी अशोक लोखंडे,विलास भोर, मार्गदर्शक शिक्षक श्रीकृष्ण डुकरे,वैजंता लोखंडे हे शिक्षक शिष्यवृत्ती तास घेताना दिसले,

साकोरे मळा शिंगवे शाळेतही इयत्ता चौथीचे अभिजीत नाटे व पाचवीचे नवोदय शिक्षक नितीन शेजवळ नवोदय विद्यालयाचे तास घेत असल्याचे पहावयास मिळाले .

साकोरे मळा, नागापूर, भागडी, वळती, जिल्हा परिषद मॉडेल स्कुल शिंगवे, गाढवे, गोरडे मळा, भोकर वस्ती आदी शाळांमध्ये शिष्यवृत्ती वर्ग चालू असल्याचे पाहून रूपाली धोका यांनी समाधान व्यक्त केले, शिक्षकांची पाठ थोपटली व त्यांचा सन्मान केला. प्रत्येक शाळेमध्ये जाऊन त्यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

वळती केंद्रामध्ये दिलेल्या भेटीअंती जवळजवळ ११ पैकी भोकर वस्ती, वळती, शिंगवे, भागडी, गाढवे,गोरडे मळा, साकोरे मळा, नागापूर या शाळांमध्ये शिष्यवृत्तीचे वर्ग चालू असल्याचे पहावयास मिळाले.

आंबेगाव तालुक्यांमध्ये वारंवार शैक्षणिक उपक्रम बाबतच्या मार्गदर्शनामुळे व गटशिक्षणाधिकारी रूपाली धोका यांनी तालुक्यामध्ये स्पर्धा परीक्षेच्या संदर्भात विविध उपक्रम राबवून ते यशस्वी केल्यामुळे शिक्षकांना प्रत्यक्ष प्रोत्साहित करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्यामुळे निश्चितच शिक्षकांचा, विद्यार्थ्यांचा स्पर्धा परीक्षेच्या बाबत उत्साह वाढल्याचे दिसून येते.
- राजु जाधव,
केंद्र प्रमुख वळती

विज्ञान साहित्य नांदी संमेलनाचे गुरुवारी (ता. २६) पुण्यात आयोजन

डॉ. नितीन करमाळकर यांची माहिती; शंभराव्या मराठी साहित्य संमेलनानिमित्त मराठी साहित्य-विज्ञानाचा अनोखा संगम

पुणे (दै. आरंभ पर्व)

शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने विज्ञान साहित्य नांदी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी साहित्य आणि विज्ञानाचा संगम असलेले हे संमेलन महाराष्ट्र साहित्य परिषद, शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे आणि विज्ञान भारती पश्चिम महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले आहे. येत्या गुरुवारी (ता. २६) एस. पी कॉलेज मैदानाजवळील ज्ञानमंडपम येथील भाऊसाहेब चितळे सभागृहात हे संमेलन होणार आहे, अशी माहिती विज्ञान भारती पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष डॉ. नितीन करमाळकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी विज्ञान भारतीचे सचिव कौस्तुभ साखरे, शिक्षण प्रसारक मंडळीच्या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष सुधीर काळकर, सचिव रमा कुलकर्णी व पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या विभागप्रमुख डॉ. संजीवनी सोनार, विज्ञानभारतीचे पश्चिम क्षेत्र संघटन मंत्री श्री प्रसाद, संशोधन,



इनोव्हेशन आणि इनक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. प्रशांत दुराफे आदी उपस्थित होते.

डॉ. नितीन करमाळकर म्हणाले, "ज्येष्ठ भौतिकशास्त्रज्ञ व विज्ञान लेखक, माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर हे या विज्ञान साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आहेत. वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन मंडळाचे (सीएसआयआर) माजी महासंचालक डॉ. शेखर मांडे प्रमुख पाहुणे असणार आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण, प्रमुख कार्यवाह डॉ. स्वाती महाळंक, समर्थ युवा फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश पांडे, विज्ञान भारतीचे संस्थापक सदस्य डॉ. क. कृ. क्षीरसागर, शिक्षण प्रसारक मंडळींच्या नियामक मंडळाचे उपाध्यक्ष राधेश्याम अग्रवाल आदी उपस्थित राहणार आहेत. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पूर्वतयारीतील हे महत्त्वाचे संमेलन असणार आहे. त्यामुळे मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्या आणि प्रामुख्याने मराठीतून विज्ञानाचा प्रचार प्रसार करु इच्छिणाऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने या संमेलनाला उपस्थित राहावे." सुधीर काळकर म्हणाले, "या संमेलनाचे संयोजक शिक्षण प्रसारक मंडळीचे संशोधन, इनोव्हेशन व इन्क्युबेशन केंद्र आहे. अशाप्रकारचे संमेलन आयोजित करण्याची संधी मिळणे ही आमच्यासाठी आनंदाची बाब आहे. यानिमित्ताने शिक्षण, विज्ञान आणि साहित्य तिन्ही गोष्टी एकत्र अनुभवता येणार आहेत. येणाऱ्या पिढीला वैज्ञानिक दृष्टीकोन कसा देतानाच नवनिर्मितीला चालना मिळावी, हा संमेलनाचा मुख्य उद्देश आहे. नवोपक्रम, विज्ञान संशोधन व स्टार्टअप संस्कृती विकसित होण्यास या संमेलनामुळे निश्चितच मदत होईल."

कौस्तुभ साखरे म्हणाले, "एकदिवसीय संमेलनात उद्घाटन व समारोप सत्रासोबतच विज्ञानकथा वाचन, विज्ञान साहित्यिक परिसंवाद, शास्त्रज्ञांशी विशेष संवाद व पॉडकास्ट अशी विशेष सत्रे होतील. मराठीतील विज्ञानविषयक साहित्याचा गौरव करणे आणि नवोदित लेखक आणि विज्ञान संवादकांना व्यासपीठ उपलब्ध करुन देणे हा या संमेलनाचा मुख्य उद्देश आहे. यासोबतच संमेलनाच्या निमित्ताने मराठी विज्ञानकथा लेखन आणि अभिवाचन स्पर्धेची घोषणा केली जाणार आहे."

कोटक लाइफ तर्फे कोटक व्हेरिएबल इंडेक्स ॲन्युइटी प्लॅन सादर

मुंबई (दै. आरंभ पर्व)



कोटक महिंद्रा लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने ("कोटक लाइफ") कोटक व्हेरिएबल इंडेक्स ॲन्युइटी प्लॅन लाँच केल्याची घोषणा केली. निवृत्तीसाठीचा हा उपाय आजीवन हमीचे उत्पन्न आणि निफ्टी 50 इंडेक्सशी संलग्न वाढीची क्षमता प्रदान करतो. तो ग्राहकांना दीर्घायुष्याशी संबंधित आर्थिक जोखमींचा सामना करण्यास, महागाईचा प्रभाव कमी करण्यास आणि दीर्घकालीन आर्थिक सुरक्षा मिळवण्यास मदत करतो. पीयूष त्रिवेदी, चीफ डिस्ट्रिब्युशन ऑफिसर, कोटक लाइफ, म्हणाले, "भारतातील 60 वर्षे आणि त्याहून अधिक वयाची लोकसंख्या 2050 पर्यंत 347 दशलक्षांवर पोहोचण्याचा अंदाज आहे. त्याच वेळी, निवृत्तीची नव्याने व्याख्या केली जात आहे. आज लोक सक्रिय राहण्याची, नवीन आवडीनिवडी जोपासण्याची आणि त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात अधिक आर्थिक स्वातंत्र्य उपभोगण्याची आकांक्षा बाळगतात. या बदलामुळे अशा निवृत्ती सोल्यूशन्सची गरज निर्माण होते जी निश्चितता आणि महागाईविरुद्ध दीर्घकालीन संरक्षण या दोन्ही गोष्टी प्रदान करतात. 'कोटक व्हेरिएबल इंडेक्स ॲन्युइटी प्लॅन' हा बदल प्रतिबिंबित करतो आणि त्याची रचना नाविन्यपूर्ण व ग्राहक-केंद्रित निवृत्ती सोल्यूशन्सच्या माध्यमातून भारतीय ग्राहकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी करण्यात आली आहे." भारतात आयुर्मानात सातत्याने वाढ होत आहे; त्यामुळे, आपल्या बचतीपेक्षा जास्त आयुष्य जगण्याची शक्यता ही निवृत्तीच्या संदर्भातील वाढती चिंता ठरत आहे. 40 ते 59 वर्षे वयोगटातील व्यक्तींसाठी निवृत्तीचे नियोजन हे देखील अधिक प्राधान्याचे बनत आहे. आपल्याला किती निवृत्ती निधीची आवश्यकता भासू शकते याची अनेकांना चांगली कल्पना असली, तरी हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्यांनी पुरेशी बचत केलेली नसू शकते. परिणामी, उत्पन्नाची निश्चितता आणि काळाच्या ओघात खरेदी क्षमता टिकवून ठेवण्याची क्षमता या दोन्ही गोष्टी प्रदान करणाऱ्या हायब्रिड सोल्यूशन्सची मागणी वाढत आहे. कोटक व्हेरिएबल इंडेक्स ॲन्युइटी प्लॅनची रचना आजीवन हमी ॲन्युइटी उत्पन्नाच्या निश्चिततेसह इंडेक्स-संलग्न वाढीच्या क्षमतेचा मेळ घालून या बदलत्या निवृत्ती गरजा पूर्ण करण्यासाठी करण्यात आली आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

भाजी मंडईचे चार कोटी पाण्यात

- अनेक वर्षांपासून धूळखात पडलेली मंडई आता बनली भंगाराचे आगार!
- विक्रेत्यांसाठी उभारलेली मंडई वापराविना; साफसफाई कर्मचाऱ्यांच्या साहित्याचा साठा करण्यासाठीच मंडईचा वापर?
- रिक्षाचालकांनी बनविले वाहनतळ; विक्रेते मात्र रस्त्यावरच!











पुणे-सोमनाथ साळुंके
(दै. आरंभ पर्व)

कळस परिसरातील भाजी विक्रेत्यांची आणि ग्राहकांची गैरसोय दूर करण्यासाठी पुणे महापालिकेच्या मंडई विभागामार्फत सुमारे चार कोटी रुपये खर्च करून उभारण्यात आलेली भाजी मंडई गेल्या अनेक वर्षांपासून धूळखात पडून आहे. विक्रेत्यांसाठी उभारलेली मंडई वापराविना पडून असताना रस्त्यालगत भाजी विक्री सुरू असल्याने वाहतूक कोंडीची समस्या कायम आहे. त्यामुळे जनतेच्या कररूपी पैशातून उभारलेल्या या मंडईचा उपयोग नेमका कोणासाठी, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पुणे शहरापासून सुमारे दहा ते बारा किलोमीटर अंतरावर असलेला कळस परिसर हा आळंदी मार्गावरील महत्त्वाचा उपनगर भाग आहे. सुमारे ३० ते ३५ वर्षांपूर्वी या परिसराचा महापालिकेत समावेश करण्यात आला. त्यानंतर परिसरातील पायाभूत सुविधा आणि विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांना होती. मात्र, अनेक विकासकामांचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांपर्यंत पोहोचत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. कळस आणि विश्रांतवाडी या परिसरांमध्ये मोठ्या प्रमाणात नागरिकांची वस्ती वाढली असून भाजी विक्रीचा व्यवसायही मोठ्या प्रमाणावर विस्तारला आहे. कळस ते विश्रांतवाडी हे अंतर सुमारे दीड ते दोन किलोमीटर असल्याने कळस परिसरातील नागरिक, विशेषतः महिला ग्राहकांना भाजी खरेदीसाठी विश्रांतवाडीपर्यंत जाणे गैरसोयीचे ठरत होते. परिणामी कळस परिसरात रस्त्याच्या कडेला भाजी विक्रेत्यांनी दुकाने थाटली. यामुळे वाहनचालकांना वारंवार वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता. विक्रेत्यांनाही उन्हात-पावसात व्यवसाय करावा लागत असल्याने त्यांची आणि ग्राहकांची गैरसोय होत होती.

ही समस्या सोडविण्यासाठी महापालिकेने सुमारे १५ वर्षांपूर्वी कळस ते विश्रांतवाडी मार्गावर अर्धा ते पाऊण एकर जागेत भाजी मंडई उभारली. या मंडईसाठी जवळपास चार कोटी रुपये खर्च करण्यात आले. मंडईला 'कुरंजाई माता ओटा मार्केट' असे नावही देण्यात आले. विक्रेत्यांसाठी इमारतीच्या आतमध्ये ओटे, ग्राहक आणि विक्रेत्यांसाठी स्वच्छतागृह अशा सुविधा निर्माण करण्यात आल्या.

मात्र, प्रत्यक्षात या सुविधांचा वापरच होत नसल्याने संपूर्ण मंडईची दुरवस्था झाली आहे. मंडईतील स्वच्छतागृहांचे दरवाजे तुटलेल्या अवस्थेत आहेत. भाजी विक्रेत्यांसाठी बांधण्यात आलेले ओटे धूळखात पडले आहेत. परिसरात कचरा गोळा करणाऱ्या जुन्या घंटागाड्या अस्ताव्यस्त अवस्थेत उभ्या असून अनेक ठिकाणी लोखंडी साहित्य पडलेले आहे. त्यामुळे भाजी मंडईचे रूपांतर जणू भंगाराच्या आगारात झाले आहे.

विशेष म्हणजे, मंडईसाठी राखून ठेवलेल्या मोकळ्या जागेचा वापर आता वाहनतळ म्हणून होत असल्याचे चित्र आहे. अनेक रिक्षाचालकांनी येथे रिक्षा उभ्या केल्या आहेत. त्यामुळे ही जागा भाजी मंडई आहे की वाहनतळ, असा प्रश्न नागरिकांना पडत आहे. याशिवाय महापालिकेचे साफसफाई कर्मचारीही या जागेचा वापर करत असल्याचे दिसून येते. एकीकडे सर्वसामान्य नागरिकांना घरपट्टी भरण्यास विलंब झाल्यास महापालिकेकडून कठोर कारवाई केली जाते. मात्र, जनतेच्या करातून कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेल्या सार्वजनिक सुविधांची देखभाल आणि वापर सुनिश्चित करण्याबाबत प्रशासन उदासीन का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. मंडई सुरू असती तर विक्रेत्यांना हक्काची जागा मिळाली असती आणि रस्त्यावरील भाजी विक्रीमुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडीही कमी झाली असती. परंतु, मंडई असूनही विक्रेते रस्त्यावरच व्यवसाय करत असल्याने सकाळी आणि संध्याकाळी वाहनचालकांना पुन्हा वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. रस्त्यावरील विक्रेत्यांवर कारवाई करण्याऐवजी प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. महापालिका प्रशासनाने संबंधित भाजी विक्रेत्यांची बैठक घेऊन त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात. मंडईतील पाणी, स्वच्छता, वीज, सुरक्षितता आणि आवश्यक सुविधांची दुरुस्ती करून विक्रेत्यांना तेथे व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहित करावे. तसेच रस्त्यावरील विक्रेत्यांचे योग्य नियोजन करून मंडई पुन्हा कार्यान्वित करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

जनतेच्या पैशातून उभारलेल्या विकासकामांचा लाभ जनतेलाच मिळत नसेल, तर अशा विकासकामांचा उपयोग काय? कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारलेली मंडई धूळखात पडणार असेल, तर जबाबदारी निश्चित कोणाची? या प्रश्नांची उत्तरे महापालिका प्रशासनाने देण्याची गरज आहे. अन्यथा 'पुणे तेथे काय उणे?' या म्हणीला विकासाऐवजी निष्क्रिय कारभाराचा अर्थ प्राप्त होईल, अशी संतप्त भावना परिसरातील नागरिक व्यक्त करत आहेत.

कळसमध्ये मंडई रिकामी, विश्रांतवाडीत विक्रेते रस्त्यावर!

कळसप्रमाणेच विश्रांतवाडी परिसराचाही सुमारे ३० ते ३५ वर्षांपूर्वी महापालिकेत समावेश झाला. मात्र, येथील भाजी मंडई आजही भर रस्त्यात भरत आहे. भाजी विक्रेत्यांना पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, वीज आणि पत्र्याचे शेड अशा मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. विशेष म्हणजे, विक्रेत्यांकडून महापालिका कर आकारत असतानाही त्यांना आवश्यक सुविधा मिळत नसल्याची तक्रार आहे. कळस येथील चार कोटी रुपये खर्चून उभारलेली मंडई वापराविना पडून असताना विश्रांतवाडीतील विक्रेत्यांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. कळसच्या मंडईसाठी खर्च झालेल्या निधीचा उपयोग विश्रांतवाडीतील भाजी विक्रेत्यांच्या सुविधांसाठी झाला असता, तर येथील अनेक समस्या सुटल्या असत्या, अशी चर्चा परिसरात सुरू आहे. दोन्ही भागांतील भाजी विक्रेत्यांच्या समस्या सोडविण्यासाठी महापालिका प्रशासनाने एकत्रित नियोजन करण्याची गरज आहे.

लोहगावात विनापरवाना रस्त्याचे खोदकाम सुरु असल्याचा आरोप



लोहगाव (दै. आरंभ पर्व)

लोहगाव येथील वडगाव शिंदे रस्त्यावर, महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागामार्फत राबविला जाणारा सीसीटीव्ही प्रकल्पाकरिता केबल टाकण्यासाठी रस्त्याच्या एका बाजूने खोदकाम सुरू आहे. मात्र, या खोदकामासाठी पुणे महानगरपालिकेची अधिकृत परवानगी घेतली नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात आला आहे. या कामाबाबत संबंधित कंत्राटदाराकडे विचारणा केली असता, गृह खात्यामार्फत राबविल्या जाणाऱ्या सीसीटीव्ही प्रकल्पातील केबल टाकण्यासाठी खोदकाम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र त्यांच्याकडे कोणतीही परवानगी आढळून आली नसल्याचा दावा स्थानिक नागरीकांकडून करण्यात आला आहे. वडगाव शिंदे रस्ता हा अत्यंत रहदारीचा मार्ग असून, या रस्त्यावरून शाळेच्या बसेस, लहान मुले, दुचाकीस्वार आणि नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहनांचे किरकोळ अपघात होत असतात. अनेकदा काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्याची डागडुजी केली जात नसल्याची तक्रार नागरीक करत आहेत.

स्थानिकांचा कोणत्याही कामाला विरोध नाही; मात्र काम करण्याकरिता महापालिकेची परवानगी आवश्यक आहे. शिवाय काम पुर्ण झाल्यानंतर रस्त्याची डागडुजी होणेही गरजेचे आहे.
- संदीप दौंडकर, स्थानिक नागरीक

या खोदकामाकरिता कंत्राटदाराने आवश्यक परवानगी घेतलेली नव्हती. त्यामुळे काम तात्काळ बंद करण्याच्या सूचना दिल्या आहेत.
- अक्षय वाडेकर, कनिष्ठ अभियंता पथ विभाग

काठापुर बुद्रुकच्या तरूण शेतकऱ्याची कमाल

कोथिंबीर पिकातून १० एकर क्षेत्रातून अवघ्या दीड महिन्यात मिळवले २० लाखांचे उत्पन्न

आंबेगाव (दै. आरंभ पर्व)

पारंपरिक पिकांना फाटा देत आधुनिक शेतीची कास धरल्यास शेती हा नक्कीच फायदेशीर व्यवसाय ठरू शकतो, हे एका प्रगतशील शेतकऱ्याने पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवले आहे. आंबेगाव तालुक्याच्या पुर्व भागातील काठापुर बुद्रुक येथील सुनील बाळासाहेब पोखरकर या शेतकऱ्याने अवघ्या दीड महिन्याच्या कालावधीत १० एकर क्षेत्रातील कोथिंबीर पिकातून तब्बल २० लाख रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळवले आहे. विशेष म्हणजे पोखरकर यांची स्वताची जमीन नसताना खंडाने करायला घेतलेल्या शेतीतून हे उत्पन्न मिळवले आहे त्यांच्या या यशाचे परिसरातून कौतुक होत आहे. सुनील पोखरकर यांची स्वताची घरची जमीन कमी असल्याने त्यांनी अजित हिंगे यांची लाखनगाव व पोंदेवाडीच्या हद्दीवर असलेली १० एकर जमीन खंडाने घेतली. बाजारातील कोथिंबिरीची वाढती मागणी आणि दराचा अचूक अंदाज घेत सुनील पोखरकर यांनी एकाच वेळी (दि. १५) सप्टेंबर ला १० एकर शेतात कोथिंबिरीचे बी टाकले. सर्व क्षेत्राला एकाच वेळी पाणी न देता दोन दोन दिवसाच्या अंतराने विभाग करून पाणी दिले बी टाकल्यानंतर अवघ्या ४० ते ४५ दिवसांत कोथिंबीर काढणीस तयार झाली. पाण्याचे अचूक नियोजन करण्यात आले. तसेच वेळेवर खतांची व औषधांची मात्रा दिल्याने कोथिंबिरीला चांगला हिरवागार रंग आणि दर्जा प्राप्त झाला. यावर्षी दुष्काळी परिस्थिती मुळे काढणीच्या वेळी बाजारपेठेत कोथिंबिरीची आवक कमी असल्याने या मालाला विक्रमी दर मिळाला. त्यांच्या शेतातील कोथंबीरच्या प्रती शंभर जुडीला दोन हजार रुपयांपासून ते चार हजार २०० रुपयांपर्यंत दर मिळाला दहा एकरातून एकूण ६० हजार जुडी उत्पादन निघाले एकूण २० लाख रुपये उत्पन्न मिळाले. बी, खते, औषधे, मजुरी , वहातुक खर्च असा एकूण सात लाख रुपये उत्पादन खर्च आला खर्च वजा जाता सुनील पोखरकर यांना १३ लाख रुपयांचे निव्वळ उत्पन्न मिळाले.



कमी खर्चात आणि कमी वेळेत अधिक नफा देणाऱ्या पालेभाज्यांच्या लागवडीकडे वळण्यासाठी सुनील पोखरकर यांच्या यशोगाथेमुळे परिसरातील तरुण शेतकऱ्यांना मोठी प्रेरणा मिळाली आहे.

२५ नोव्हेंबरला इंदापुरात दुहेरी राजकीय रणसंग्राम!

- तहसीलदारांच्या विरोधात मोर्चा, तर समर्थनार्थ प्रतिमोर्चाचे रणशिंग; हनुमंत कोकाटे आक्रमक!
- विरोधकांच्या मोर्चापेक्षा मोठे शक्तिप्रदर्शन करण्याचा हनुमंत कोकाटे यांचा निर्धार
- एसआयआरमधील कथित गैरप्रकारांवरून भाजपवर आरोपांची सरबत्ती



इंदापूर-अक्षय यादव
(दै. आरंभ पर्व)

इंदापूरचे तहसीलदार जीवन बनसोडे यांच्या कार्यपद्धतीवरून तालुक्यात सुरू झालेला राजकीय संघर्ष आता अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत. बनसोडे यांच्या विरोधात २५ नोव्हेंबर रोजी सर्वपक्षीय मोर्चा काढण्याची घोषणा झाल्यानंतर आता त्यांच्याच समर्थनार्थ त्याच दिवशी भव्य सर्वपक्षीय प्रतिमोर्चा काढण्याची घोषणा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे तालुकाध्यक्ष हनुमंत कोकाटे यांनी केली आहे. विरोधकांच्या मोर्चापेक्षा मोठे शक्तिप्रदर्शन करून तहसीलदारांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. शाह सांस्कृतिक भवन येथे आयोजित सर्वपक्षीय पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या पत्रकार परिषदेत एसआयआर प्रक्रियेतील कथित गैरप्रकारांचा मुद्दा केंद्रस्थानी राहिला. सचिन सपकाळ यांनी भाजपच्या काही पदाधिकारी व कार्यकर्त्यांवर गंभीर आरोप करत इंदापूर तालुक्यातील विविध गावांमधील नागरिकांची नावे मतदार यादीतून वगळण्यासाठी फॉर्म क्रमांक ७ द्वारे हरकती दाखल करण्यात आल्याचा दावा केला. संबंधित प्रकार तहसीलदार जीवन बनसोडे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी या प्रकरणात गुन्हे दाखल करण्याची भूमिका घेतल्याचे सांगण्यात आले. हा प्रकार उघडकीस येऊ नये आणि तहसीलदारांवर दबाव निर्माण व्हावा, यासाठी त्यांच्या विरोधात मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याचा आरोपही सपकाळ यांनी केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मतदानाचा मूलभूत अधिकार हिरावून घेण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. हनुमंत कोकाटे यांनी तहसीलदार जीवन बनसोडे यांच्या कामकाजाचे जोरदार समर्थन केले. "माझ्या राजकीय आयुष्यात जीवन बनसोडे यांच्यासारखा चांगला तहसीलदार मी पाहिलेला नाही. त्यांचा कारभार पारदर्शक आणि लोकाभिमुख आहे. सर्वसामान्य नागरिकांचे काम योग्य असेल तर ते कोणत्याही अटी-शर्तींशिवाय तातडीने मार्गी लावतात," अशा शब्दांत त्यांनी बनसोडे यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. तसेच २५ नोव्हेंबर रोजी विरोधकांच्या मोर्चापेक्षा मोठा प्रतिमोर्चा काढून जनसमर्थन दाखविणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.राष्ट्रवादी काँग्रेसचे ॲड. राहुल मखरे यांनीही एसआयआर प्रक्रियेतील कथित गैरप्रकारांवरून संबंधितांवर निशाणा साधला. हयात नागरिकांची नावे मतदार यादीतून वगळण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोप करत हा प्रकार अत्यंत गंभीर असल्याचे त्यांनी सांगितले. संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी २५ नोव्हेंबरच्या मोर्चाद्वारे करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या पत्रकार परिषदेस पंचायत समितीचे सभापती हर्षवर्धन लोंढे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे तालुकाध्यक्ष हनुमंत कोकाटे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट)च्या कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे प्रमुख ॲड. राहुल मखरे, महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक अध्यक्ष संजय सोनवणे, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रताप पाटील, सचिन सपकाळ, ॲड. किरण लोंढे, अतुल झगडे, उपनगराध्यक्ष बाळासाहेब ढवळे, स्वप्निल राऊत, शेखर पाटील, शिवाजीराव तरंगे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तहसीलदार जीवन बनसोडे यांच्या विरोधात आणि समर्थनार्थ एकाच दिवशी मोर्चे निघणार असल्याने इंदापूरच्या राजकीय वातावरणात चांगलीच खळबळ उडाली आहे. दोन्ही बाजूंकडून शक्तिप्रदर्शनाची तयारी सुरू झाली असून, कोणत्या मोर्चाला अधिक प्रतिसाद मिळतो, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. या आंदोलनातून तहसीलदारांच्या कार्यपद्धतीचा मुद्दा आता राजकीय प्रतिष्ठेचा विषय बनल्याचे चित्र दिसत आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



विद्यार्थ्यांसाठी ऑटोमोटिव्ह सायबर सुरक्षा क्षेत्रात करिअरच्या सुवर्णसंधी

पुणे (आरंभ पर्व) : विद्यार्थ्यांमध्ये ऑटोमोटिव्ह सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून देणे तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचे व्यावहारिक ज्ञान देण्याच्या उद्देशाने 'ऑटोमोटिव्ह फ्यूचर अँड मोबिलिटी समिट २०२६' चे आयोजन डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सभागृह, वल्लभनगर, पिंपरी येथे करण्यात आले. या समिटमध्ये १,३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ, ऑटोमोबाईल उद्योगातील तज्ज्ञ आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रतिनिधी एकाच व्यासपीठावर आले. ऑटोमोबाईल उद्योगातील बदल, भविष्यातील मोबिलिटी, वाहन सुरक्षा, सायबर सुरक्षा आणि करिअरच्या नव्या संधी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच भविष्यात ऑटोमोबाईल क्षेत्रात सायबर सुरक्षेचे वाढते महत्त्व आणि या क्षेत्रातील करिअरच्या संधींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या समिटचे संयुक्त आयोजन ज्ञानप्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, केंद्रीय रस्ते परिवहन संस्था (CIRT) तसेच जगमंगल सोशल फाउंडेशनच्या प्रयास (PRAYAAS) या उपक्रमांतर्गत करण्यात आले. ऑटो सिफू (AutoSifu) हे या कार्यक्रमाचे तंत्रज्ञान भागीदार होते.

जेजुरीच्या तंत्रनिकेतनच्या नामकरणावरून वाद!

- पुरंदरच्या इतिहासाचं नाव द्या, ग्रामस्थांची मागणी

जेजुरी (आरंभ पर्व) : जेजुरी येथील शासकीय तांत्रिक विद्यालय केंद्राच्या नामकरणाच्या मुद्द्यावरून पुरंदर तालुक्यात चर्चेला उधाण आले आहे. शासनाकडून या संस्थेला नवे नाव देण्याचा निर्णय जाहीर झाल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयानंतर स्थानिक पातळीवर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. ग्रामस्थांच्या एका गटाने या नामकरणाबाबत पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे. पुरंदर तालुक्याला छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्यापासून ते उमाजी नाईक, बाजी पासलकर, मुरारबाजी देशपांडे यांच्यापर्यंतच्या शौर्याचा आणि बलिदानाचा मोठा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. जेजुरीच्या विकासात मल्हारराव होळकर, सगनभाऊ जेजुरीकर यांच्यासह अनेक मान्यवरांचे योगदान आहे, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर संस्थेला नाव देताना स्थानिक इतिहास आणि जनभावना विचारात घ्यावी, अशी मागणी पुढे येत आहे. या संस्थेत परिसरातील शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी तांत्रिक शिक्षण घेतात. त्यामुळे संस्थेचे नाव हे स्थानिक विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे असावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या मागणीसाठी दादा फाउंडेशनच्यावतीने स्थानिक लोकप्रतिनिधींशी चर्चा करून शासनाकडे निवेदन देण्याची तयारी सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. शासनाने या विषयावर सकारात्मक विचार करावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

उरुळी कांचन ग्रामपंचायतीत विधी सेवा शिबिर उत्साहात



पुणे (आरंभ पर्व) : सर्वसामान्य नागरिकांना कायदेशीर हक्क, अधिकार आणि उपलब्ध न्यायव्यवस्थेची माहिती सहजपणे मिळावी, या उद्देशाने एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लॉ, उरुळी कांचन ग्रामपंचायत आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (DLSA) यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत कार्यालयात विधी सेवा (लीगल एड) शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात उपस्थित मान्यवरांनी नागरिकांना विविध कायदेशीर तरतुदी, त्यांचे मूलभूत हक्क, न्याय मिळविण्याच्या प्रक्रिया आणि विधी सेवा प्राधिकरणामार्फत उपलब्ध असलेल्या कायदेशीर सहाय्याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी ग्रामस्थांनी आपले वैयक्तिक तसेच स्थानिक पातळीवरील कायदेशीर प्रश्न मांडले. त्यावर उपस्थित वकिलांनी प्रश्नांचे स्वरूप समजून घेत कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन केले. त्यामुळे नागरिकांना आपल्या कायदेशीर समस्यांबाबत योग्य दिशा मिळण्यास मदत झाली. या कार्यक्रमाला उरुळी कांचनचे सरपंच मिलिंद टी. जगताप, जिल्हा नियोजन समिती सदस्य तथा यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक संतोष आबासाहेब कांचन पाटील, ग्रामविकास अधिकारी पाटील, मोजणी अधिकारी सतिश कुदळे, हवेली तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या व्हीजेएनटी सेलचे अध्यक्ष दिलीप गाडेकर, माजी ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र टिळेकर, स्कूल ऑफ लॉ चे प्रभारी अधिष्ठाता डॉ.गोविंद राजपाल, प्रा.आदित्य केदारी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लॉमधील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला. एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष व प्र.कुलपती प्रा.डॉ. मंगेश कराड यांच्या प्रेरणेने, तसेच सरपंच मिलिंद जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

पुरुषांच्या हक्कांसाठी स्वतंत्र आयोग स्थापन करा; भूमाता ब्रिगेडची मागणी



पुणे (आरंभ पर्व) : समाजातील प्रत्येक पुरुषाच्या संघर्षाची, कष्टांची, त्यागाची आणि भावनांची दखल घेतली गेली पाहिजे. पुरुष हा केवळ कुटुंबाचा आधार नसून तोदेखील भावना, वेदना, जबाबदाऱ्या आणि विविध आव्हानांशी लढणारा माणूस आहे. त्यामुळे पुरुषांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला न्याय देण्यासाठी स्वतंत्र पुरुष हक्क आयोगाची स्थापना करण्यात यावी, अशी ठाम मागणी भूमाता ब्रिगेडच्या संस्थापक तृप्ती देसाई यांनी आंतरराष्ट्रीय पुरुष दिनानिमित्त केली. पुरुषांच्या कष्टांची, भावनांची आणि आत्मसन्मानाची समाजाने दखल घेणे आवश्यक आहे. महिलांचा सन्मान आणि पुरुषांचे अधिकार हे एकमेकांच्या विरोधात नसून स्त्री-पुरुष समानता म्हणजे दोघांनाही समान न्याय, समान संधी आणि समान सन्मान मिळणे होय, असे मत त्यांनी व्यक्त केले.

जर्सी गाईंच्या नर वासरांना बेवारस सोडू नका

- शेतकऱ्यांना प्राणीमित्र संघटनेचे आवाहन
- निर्जनस्थळी आढळतात वासरे; अन्न-पाण्याविना मृत्यू किंवा हिंस्त्र प्राण्यांच्या हल्ल्याची भीती – वासरे सोडणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी



अहिल्यानगर / संजय मोरे (दै. आरंभ पर्व)

दूध उत्पादनासाठी जर्सी गाईंचे पालन करणाऱ्या काही शेतकऱ्यांकडून नर वासरांना बेवारस अवस्थेत निर्जन ठिकाणी सोडून दिले जात असल्याचा गंभीर प्रकार अहिल्यानगर जिल्ह्यात समोर येत आहे. अशा निष्पाप वासरांना अन्न-पाण्याविना तडफडून मृत्यूला सामोरे जावे लागत असून, अनेकदा मोकाट कुत्री, लांडगे, बिबटे आणि अन्य हिंस्त्र प्राण्यांच्या हल्ल्यांनाही त्यांना बळी पडावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी नर वासरांना बेवारस सोडू नये, तसेच प्राणीमित्र संघटना आणि गोसेवकांनी पुढाकार घेऊन अशा वासरांच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी पुढे येत आहे. ग्रामीण भागातील शेती आणि पशुपालन हे एकमेकांशी जोडलेले व्यवसाय आहेत. शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नामध्ये गाई-म्हशींचे महत्त्व मोठे आहे. मात्र, बदलत्या परिस्थितीत पशुपालन व्यवसायासमोर अनेक आर्थिक आणि व्यवस्थापकीय अडचणी निर्माण झाल्या आहेत. जनावरांसाठी चारा, पाणी, निवारा आणि वैद्यकीय उपचारांची व्यवस्था करणे पशुपालकांसाठी दिवसेंदिवस कठीण होत आहे. विशेषतः दूध उत्पादनासाठी पाळल्या जाणाऱ्या जर्सी गाईंपासून नर वासरांचा जन्म झाल्यानंतर त्यांच्या संगोपनाचा प्रश्न निर्माण होत असल्याचे दिसून येते.

मात्र, आर्थिक अडचणी असल्या तरी मुक्या जनावरांना निर्जनस्थळी सोडून देणे हा त्यावरचा उपाय होऊ शकत नाही. गोवंशाचे संवर्धन आणि संरक्षण ही केवळ शेतकरी, पशुपालक किंवा गोसेवकांची जबाबदारी नसून ती सामूहिक सामाजिक जबाबदारी आहे. शासनानेही या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. शेतकरी आणि सामाजिक संस्थांवर संपूर्ण जबाबदारी टाकून शासनाला हात झटकता येणार नाही. पारनेर तालुक्यातील गारखिंडी घाट, पाबळ रस्ता, पाडळी दर्या घाट, पुणेवाडी घाट, विरोली गणपती पठार, करंडी, गोरेगाव घाट, तिखोल परिसर आणि मांडवा घाट परिसरातील निर्जन, आडरान व माळरान भागात गोंडस आणि देखणी वासरे बेवारसपणे सोडून दिल्याचे आढळून येत आहे.

या वासरांना अन्न-पाणी मिळत नसल्याने त्यांची अवस्था अत्यंत दयनीय होत आहे. अनेकदा मोकाट कुत्री, लांडगे, बिबटे आणि इतर हिंस्त्र प्राणी या वासरांवर हल्ला करून त्यांना जखमी करतात किंवा ठार मारतात. अशा निष्पाप जनावरांची होणारी ही अवस्था पाहून कोणत्याही संवेदनशील व्यक्तीचे मन हेलावल्याशिवाय राहणार नाही.

गोवंश रक्षणासाठी केवळ घोषणा करून चालणार नाही, तर प्रत्यक्ष कृतीची आवश्यकता आहे. शासनाने गोशाळांना पुरेशी आर्थिक मदत द्यावी, चारा-पाण्याची व्यवस्था करावी तसेच जनावरांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी पशुवैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. गोशाळा आणि गोसंवर्धन केंद्रांना सक्षम करण्यासाठी विशेष योजना राबविणे गरजेचे आहे.

ग्रामीण भागातील गोवंशाचे महत्त्व लक्षात घेता जनावरांच्या संगोपनासाठी कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे. गोवंश रक्षणाची जबाबदारी केवळ सामाजिक संस्था किंवा गोसेवकांवर न टाकता शासनानेही सक्रिय सहभाग घ्यावा.

प्राणीमित्र संघटनांनी पुढाकार घेण्याची गरज

शेतकऱ्यांना गाईंचे संगोपन करणे आर्थिकदृष्ट्या शक्य नसल्यास त्यांनी नर वासरांना बेवारस सोडण्याऐवजी गोशाळा किंवा गोसंवर्धन संस्थांकडे सुपूर्द करावे. त्याचप्रमाणे प्राणीमित्र संघटनांनी पुढाकार घेऊन निर्जनस्थळी सोडलेल्या वासरांचा शोध घ्यावा आणि त्यांना सुरक्षित निवारा उपलब्ध करून द्यावा. अन्न-पाण्याविना तडफडून मरण्यापेक्षा किंवा हिंस्त्र प्राण्यांची शिकार होण्यापेक्षा या वासरांना सुरक्षित ठिकाणी संगोपन मिळणे आवश्यक आहे. अशा संस्थांना शासनाने आर्थिक मदत देऊन गोवंश संरक्षणाची व्यवस्था अधिक सक्षम करावी. दूध देणाऱ्या गाईंचे सर्वेक्षण करण्याबरोबरच त्यांच्या वासरांची नोंद ठेवण्याची यंत्रणाही निर्माण करावी, अशी मागणी होत आहे.

गोवंश संवर्धन ही सामाजिक जबाबदारी

गाईंचे संवर्धन म्हणजे केवळ जनावरांचे संरक्षण नव्हे, तर ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शेतीपूरक व्यवसायाला बळ देण्याचे काम आहे. त्यामुळे पशुपालकांच्या अडचणी समजून घेऊन शासनाने गोवंश संवर्धनासाठी ठोस निर्णय घ्यावेत. पशुपालकांवर जनावरे बेवारस सोडण्याची वेळ येऊ नये, यासाठी आर्थिक मदत आणि संगोपनाच्या पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

वासरांना बेवारस सोडणाऱ्यांवर कारवाई करा!

गाईच्या दुधासाठी मुक्या प्राण्यांवर अत्याचार करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कृत्यांचे समर्थन करता येणार नाही. सामाजिक काम करणाऱ्या संस्था आणि प्राणीमित्र संघटनांच्या माध्यमातून दुभत्या जनावरांचे सर्वेक्षण करण्यात यावे. ज्या शेतकऱ्यांकडे वासरे नाहीत, त्यांच्या बाबतीत तपासणी करून वासरे बेवारस सोडल्याचे किंवा त्यांच्यावर अत्याचार झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांवर प्रचलित कायद्यानुसार कठोर कारवाई करावी. अशा प्रकरणांत योग्य कायदेशीर तरतुदींनुसार गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी सौ. मेघाताई खरात (जांभळे, ता. अकोले) यांनी केली आहे.

सलमान खानच्या डान्स आणि स्वॅगचा तडका



पुणे (दै. आरंभ पर्व)

उत्साहाला नवी उंची देत, 'मातृभूमी: मे वॉर रेस्ट इन पीस' या चित्रपटातील नवीन गाणे 'मदिरापान'मध्ये सलमान खान आपल्या खास डान्स स्टाइल आणि सहजसुंदर स्वॅगसह पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. हे गाणे म्हणजे लष्करी जीवनातील धमाल, मस्ती आणि बंधुभावाचे दर्शन घडवणारा एक सुंदर अनुभव आहे. या गाण्यात सलमान खान आपल्या सहकारी जवानांसोबत धमाल डान्स करत आणि आनंद साजरा करताना दिसत आहे. सलमान खान आणि चित्रांगदा सिंह यांची केमिस्ट्री गाण्याच्या दृश्यात्मक आकर्षणात आणखी भर घालते. गाण्याची उत्साही ऊर्जा, कलाकारांचा आकर्षक अंदाज आणि प्रत्येक फ्रेममधील दमदार स्क्रीन प्रेझेन्स प्रेक्षकांसाठी एक पर्वणीच ठरणार आहे. हिमेश रेशमिया यांचे ठेका धरायला लावणारे संगीत, मुदस्सर खान यांचे जबरदस्त नृत्यदिग्दर्शन आणि समीर अंजान यांनी लिहिलेले बोल यांमुळे 'मदिरापान' हे गाणे प्रत्येक पार्टीची रंगत वाढवणारे आणि चार्टबस्टर ठरण्याची क्षमता असलेले गाणे आहे.

पुरंदरच्या शिरपेचात मानाचा तुरा!



दत्तात्रय भोंगळे यांची राज्य कार्यकारिणीवर निवड

जेजुरी (दै. आरंभ पर्व)

पत्रकारांची मातृसंस्था आणि सर्वात जुनी संस्था असलेल्या अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या राज्य कार्यकारिणीचे सदस्य म्हणून पुरंदर तालुका मराठी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष आणि दैनिक सकाळचे ज्येष्ठ पत्रकार श्री. दत्तात्रय भोंगळे यांची निवड करण्यात आली आहे.

आचार्य प्र. के. अत्रे, पा. वा. गाडगीळ, अनंत भालेराव यांसारख्या दिग्गज पत्रकारांनी ज्या संस्थेचे अध्यक्षपद भूषवले, त्याच गौरवशाली परंपरेच्या परिषदेत आता पुरंदरच्या भोंगळे यांना स्थान मिळाले आहे. विद्यमान अध्यक्ष शिवराज काटकर यांच्या नेतृत्वाखालील राज्य कार्यकारिणीत ही निवड झाली आहे. पुरंदर तालुक्यात पत्रकार संघटनेची मुहूर्तमेढ रोवून, विखुरलेल्या ग्रामीण पत्रकारांना एका छताखाली आणण्याचे ऐतिहासिक काम श्री. भोंगळे यांनी केले. दैनिक सकाळच्या माध्यमातून गेली अनेक वर्षे त्यांनी पुरंदर तालुक्यातील शेती, पाणी, रस्ते, शिक्षण आणि सर्वसामान्यांचे प्रश्न सातत्याने, निर्भीडपणे मांडले आहेत. निर्भीड लेखणी, तळमळीने काम करण्याची वृत्ती आणि पत्रकारांसाठी झटणारा नेता, अशीच त्यांची ओळख आहे. याच कार्याची दखल घेऊन राज्य पातळीवर त्यांची ही निवड झाली आहे. यावेळी बोलताना श्री. भोंगळे म्हणाले, "ही निवड माझी एकट्याची नाही, तर पुरंदर तालुक्यातील सर्व पत्रकारांची आहे. ग्रामीण पत्रकारांच्या हक्कांसाठी आणि प्रश्नांसाठी मी राज्य पातळीवर आवाज उठवत राहणार आहे." या निवडीमुळे पुरंदर तालुक्यातील पत्रकारांमध्ये आनंदाचे वातावरण असून, जेजुरी, सासवड, निरा, गराडे, वाल्हे, वीर, माळशिरस पुरंदर परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

रायचंद हाऊसचे दरवाजे चाहत्यांसाठी उघडणार!

'कभी खुशी कभी गम'च्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त एअरबीएनबीचा अनोखा उपक्रम

करण जोहर, हृतिक रोशन आणि करीना कपूर यांच्या आठवणींना उजाळा



पुणे (दै. आरंभ पर्व)

बॉलिवूडमधील लोकप्रिय आणि अजरामर चित्रपटांपैकी एक असलेल्या 'कभी खुशी कभी गम' (K3G) चित्रपटाला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने एअरबीएनबीने चाहत्यांसाठी एक अनोखी भेट आणली आहे. चित्रपटातील भव्य आणि प्रतिष्ठित रायचंद हाऊस आता चाहत्यांना प्रत्यक्ष अनुभवता येणार असून, 'ॲट होम विथ द रायचंद्स' या विशेष उपक्रमाच्या माध्यमातून बॉलिवूडच्या या लोकप्रिय विश्वात प्रवेश करण्याची संधी मिळणार आहे. विशेष म्हणजे, या अनुभवाचे आयोजन स्वतः चित्रपटाचे निर्माते-दिग्दर्शक करण जोहर करणार आहेत. 'कभी खुशी कभी गम' हा चित्रपट केवळ कौटुंबिक भावनांमुळेच नव्हे, तर त्यातील भव्य सेट, लोकप्रिय संवाद, फॅशन आणि अविस्मरणीय व्यक्तिरेखांमुळे आजही प्रेक्षकांच्या मनात घर करून आहे. रायचंद कुटुंबाचे आलिशान घर, त्यातील कौटुंबिक नाट्य, पूची हटके स्टाइल आणि रोहनचा आकर्षक स्वभाव या सगळ्यांनी चित्रपटाला वेगळी ओळख मिळवून दिली. आता चाहत्यांना याच रायचंद हाऊसमध्ये प्रवेश करून चित्रपटातील आठवणी पुन्हा जगता येणार आहेत. नॉस्टॅल्जिया, फॅशन, कौटुंबिक वातावरण, मनोरंजन आणि बॉलिवूड स्टारसारखे अनुभव घेण्याची संधी या उपक्रमात मिळणार आहे. हा विशेष अनुभव १ ते ६ डिसेंबर २०२६ या कालावधीत उपलब्ध असेल. या उपक्रमासाठी केवळ १८० जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. बुकिंग प्रक्रिया २३ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजता airbnb.com/k3g या संकेतस्थळावर सुरू होणार आहे. विशेष म्हणजे, हा अनुभव पूर्णपणे विनामूल्य असेल. मात्र, मुंबईला येण्या-जाण्याचा प्रवासखर्च सहभागी चाहत्यांना स्वतः करावा लागणार आहे. चित्रपटाचे निर्माते आणि दिग्दर्शक करण जोहर यांनी सांगितले की, 'कभी खुशी कभी गम'च्या निर्मितीच्या आठवणी आजही मनात ताज्या आहेत. चित्रपटाचे जग भव्य असले, तरी त्यातील भावना प्रत्येक कुटुंबाला जवळच्या वाटणाऱ्या होत्या. कुटुंब, नातेसंबंध, आपलेपणा आणि घराचे महत्त्व या भावनांवर हा चित्रपट आधारित आहे. एअरबीएनबीच्या माध्यमातून रायचंद हाऊस पुन्हा जिवंत होत असून, चाहत्यांना या काल्पनिक विश्वात प्रत्यक्ष वावरण्याची संधी मिळणार आहे, ही अत्यंत आनंदाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. पूची लोकप्रिय भूमिका साकारणारी अभिनेत्री करीना कपूर खान म्हणाली की, पू हे पात्र गेल्या २५ वर्षांपासून तिच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनले आहे. आजही नव्या पिढीमध्ये या पात्राची लोकप्रियता कायम आहे. एअरबीएनबीच्या माध्यमातून चाहत्यांना पूच्या विश्वात प्रवेश करण्याची आणि तिच्या आयकॉनिक स्टाइलचा अनुभव घेण्याची संधी मिळणार असल्याचा तिला विशेष आनंद आहे. एअरबीएनबी इंडिया आणि आग्नेय आशियाचे राष्ट्रीय प्रमुख अमनप्रीत सिंग बजाज यांनी सांगितले की, गेल्या २५ वर्षांत 'कभी खुशी कभी गम'ने आपल्या व्यक्तिरेखा, संगीत आणि कौटुंबिक भावनांच्या माध्यमातून अनेक पिढ्यांना जोडले आहे.

रायचंद हाऊस हे प्रेक्षकांच्या मनात कायमचे स्थान मिळवलेले काल्पनिक घर आहे. या उपक्रमातून चाहत्यांना त्या लोकप्रिय विश्वाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार असून, चित्रपटाचा वारसा साजरा करण्याची ही एक अनोखी संधी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अशा प्रकारे, 'कभी खुशी कभी गम'च्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त रायचंद हाऊस पुन्हा एकदा चर्चेत आले असून, जुन्या आठवणींना उजाळा देणारा हा उपक्रम बॉलिवूडप्रेमींसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.

हृतिक रोशनही आठवणींमध्ये रमले

रोहन रायचंदची भूमिका साकारणारे अभिनेता हृतिक रोशन म्हणाले की, रोहन ही त्यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाच्या व्यक्तिरेखांपैकी एक आहे. चित्रपटाच्या २५ वर्षांनंतर पुन्हा संपूर्ण टीमशी जोडले जाणे हा भावनिक अनुभव आहे. रायचंद हाऊस पुन्हा साकारलेले पाहणे आणि चाहत्यांना त्या आठवणी प्रत्यक्ष अनुभवता येणार असल्याचा आनंद असल्याचे त्यांनी सांगितले.


दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
दैनिक आरंभपर्वमध्ये
बातमीदार होण्याची संधी!
पुणे शहरासह संपूर्ण पुणे जिल्ह्यात प्रतिनिधींची नियुक्ती करणे आहे.
अल्पावधीतच पुणे शहरासह जिल्ह्यात नावारूपास आलेल्या दैनिक आरंभपर्व या वृत्तपत्रासाठी पुणे शहर, उपनगरे तसेच जिल्ह्यातील विविध तालुके व ग्रामीण भागांमध्ये बातमीदारांची नियुक्ती करण्यात येणार आहे.
पत्रकारितेची आवड असणाऱ्या,
सामाजिक प्रश्नांची जाण असणाऱ्या
आणि आपल्या परिसरातील जनतेचे
प्रश्न निर्भीडपणे मांडण्याची इच्छा असणाऱ्या
उत्साही व्यक्तींना संधी...
दैनिक आरंभपर्व PRESS
नियुक्ती करावयाची ठिकाणे
पुणे शहर व उपनगरे :
कात्रज, वारजे माळवाडी, कर्वेनगर, बाणेर, औंध, कोथरूड, हडपसर, मांजरी, आव्हाळवाडी, मुंढवा, कोरेगाव पार्क, गुजरवाडी, संगमवाडी, येरवडा, वडगाव शेरी, खराडी, वडकी, फुरसुंगी, थेऊर, लोहगाव, विश्रांतवाडी, दिघी आदी परिसर.
जुन्नर तालुका – नारायणगाव, आळेफाटा, बेल्हे, माळशेज, नाणेघाट, शिरोली.
आंबेगाव तालुका – भीमाशंकर, तळघर.
खेड तालुका – खेड, चाकण, बहुळ, वाडा, श्री क्षेत्र आळंदी, सोलू, मरकळ.
शिरूर तालुका – शिरूर, शिक्रापूर, रांजणगाव गणपती, कारेगाव, न्हावरा, तळेगाव ढमढेरे, केंदूर, पाबळ.
हवेली तालुका
उरुळी कांचन, न्हावी सांडस, पेरणे, पिंपरी सांडस.
दौंड तालुका
दौंड शहर, हिंगणगाव, यवत, राहू, पारगाव-शालू-मालू, केडगाव स्टेशन, वरवंड, खुटबाव, गिरीम, कुरकुंभ.
बारामती तालुका
नीरा, सुपा, सोमेश्वरनगर, वालचंदनगर, उंडवडी.
इंदापूर तालुका
वडापुरी, बावडा, सराटी, अंथुर्णे, निमगाव केतकी, भिगवण.
मावळ तालुका
वडगाव मावळ, मळवली, कामशेत, लोणावळा.
मुळशी तालुका
मुळशी शहर, पिरंगुट, पौड रोड, खारावडे म्हसोबा.
इच्छुकांनी संपर्क साधावा
श्री. लक्ष्मण साबळे ८६०५२८४२७२
श्री. सोमनाथ साळुंके ८४४६७९९३८३
श्री. प्रतिक गंगणे ७२७६३१४१४२

दै. आरंभ पर्वला जाहिरात देऊन तर पहा..!

आपल्या व्यवसायाची भरारी, आमच्या प्रभावी प्रसिद्धीसह..!

आपल्या उत्पादनाची, सेवांची, संस्थेची, शैक्षणिक उपक्रमांची, व्यावसायिक प्रतिष्ठानांची किंवा शुभेच्छा जाहिरातींची प्रभावी प्रसिद्धी करण्यासाठी आजच निवडा **दैनिक आरंभ पर्व.**

- **कमी खर्चात** अधिक वाचकांपर्यंत पोहोच
- **शहर, उपनगर व** ग्रामीण भागात व्यापक प्रसार
- **आकर्षक मांडणी** आणि प्रभावी सादरणीकरण
- **व्यावसायिक, सामाजिक व शासकीय** जाहिरातींसाठी विश्वासार्ह माध्यम
- **मुद्रित आणि डिजिटल** प्रसिद्धीची सुविधा

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

आपल्या यशाची सुरुवात योग्य प्रसिद्धीपासून...!



आजच जाहिरात द्या आणि आपल्या व्यवसायाला द्या नवी ओळख..!

दै. आरंभ पर्व
"जनतेच्या विश्वासाचे वृत्तपत्र"

जाहिरात विभागाशी संपर्क साधा

लक्ष्मण साबळे
पुणे निवासी संपादक

8605284272

आजची जाहिरात, उद्याची यशोगाथा..!

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

पुणे प्रहार
NEWS CHANNEL



दैनिक आरंभ पर्व व पुणे प्रहार चॅनलसाठी

संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार नेमणे आहे!



महाराष्ट्राच्या प्रत्येक तालुका, जिल्हा आणि शहरातून प्रतिनिधी हवे आहेत.

आपणही बना आमच्या टीमचा भाग !

आम्हाला हवे आहेत :

पात्रता
मराठी भाषा उत्तम लिहिता-बोलता येणे आवश्यक.
पत्रकारितेचा अनुभव असणे प्राधान्य.

कामाचे स्वरूप :
बातम्या संकलन, लेखन, रिपोर्टिंग, फोटो/व्हिडिओ कव्हरेज, स्थानिक घडामोडींचे वृत्तांकन.

आम्ही देतो :
ओळखपत्र, व्यासपीठ, मार्गदर्शन आणि योग्य मानधन.

कार्य क्षेत्र :
संपूर्ण महाराष्ट्र (जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण भाग)

आमच्याशी जोडल्याने मिळेल :

- विश्वसनीय वृत्तांकन
- व्यापक वाचकवर्ग
- निःपक्ष व सकारात्मक पत्रकारिता
- प्रत्यक्ष घडामोडींवर अचूक नजर

बातमी आहे... तर आमच्यापर्यंत पोहोचवा! **समाजाचा आवाज बना!**

आपली ओळख करा...
आपला आवाज बुलंद करा!

संपर्क : 7276314142

आजच संपर्क साधा
आणि आमच्या टीममध्ये सहभागी व्हा!